रायगड, नवी मुंबई

• वर्ष १७ • अंक ११९

www.ramprahar.com

# राम प्रहर

शुक्रवार, १५ नोव्हेंबर २०२४ • पाने ८ • किंमत ₹२


## मतदानासाठी शाळांना सुट्टी देण्याचा अधिकार मुख्याध्यापकांना




**मुंबई** : महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने राज्यात १८ ते २० नोव्हेंबर अशी सलग तीन दिवस राज्यातील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात येण्याविषयीचा प्रस्ताव शिक्षण आयुक्त कार्यालयाकडून शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. या प्रस्तावावर शासनाने उत्तर दिले आहे. त्यानुसार राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक सुरळीतपणे पार पडण्यासाठी शिक्षकांच्या निवडणूक कर्तव्यामुळे ज्या ठिकाणी शाळा भरवणे शक्य नसेल, त्या ठिकाणी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा बंद ठेवण्याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावरून घ्या तसेच आवश्यक त्या सूचना द्याव्यात, असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे शाळांना सुट्टी द्यावी की नाही हा अधिकार आता मुख्याध्यापकांना असणार आहे.

### अंतरंग


पनवेलसह रायगड विकासाचे केंद्र बनणार -पीएम मोदी/३

मतदान जागरूकतेसाठी कळंबोलीमध्ये बाईक रॅली/६

आशिया चषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा/८







# जनजाति गौरव दिवस



**भगवान बिरसा मुंडा यांना कोटी कोटी नमन**

आदिवासींना उद्योगांसाठी 15 लाखांपर्यंत व्याजरहित कर्ज देणार

शबरी, आदिम आवास योजनांसाठी 1200 कोटी/1 लाख घरे बांधणार

भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना 4000 कोटींची

250 आश्रमशाळा आदर्श आश्रमशाळा करणार

स्थानिक आदिवासी बोलीभाषेतून शिक्षण

दरवर्षी 100 आदिवासींना पीएचडीसाठी शिष्यवृत्ती

50 हजार आदिवासी विद्यार्थ्यांना नामांकित शाळेत दिले शिक्षण

आदिवासी विद्यार्थ्यांना विदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

*Matter related to "Clock" symbol of the NCP is sub-judice in the Supreme Court.

शिवसेना



भाजप-महायुती आहे, तर गती आहे

महाराष्ट्राची प्रगती आहे

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र

महायुतीला मतदान करा आणि विजयी करा

Published By: Bharatiya Janata Party, Maharashtra | C.D.O Barrack No. 1, Nariman Point, Mumbai- 400020

# उद्धव ठाकरेंनी अडीच वर्ष महाराष्ट्रावर दरोडा टाकला -मुख्यमंत्री

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकार विकासाचे मारेकरी होते. उद्धव ठाकरेंनी राज्यातील लोकांना अंधारात ढकलले. त्यांनी अडीच वर्ष महाराष्ट्रावर दरोडा टाकल्याचा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. छत्रपती संभाजीनगर येथील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारसभेत ते बोलत होते.



मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, दरोडेखोर कोण, विकास करणारे की विकासाचे मारेकरी? ज्यांनी अडीच वर्षात या महाराष्ट्रात फक्त दरोडाच टाकला. राज्याला दहा वर्षे मागे नेले, सर्व विकासकामे बंद केले मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प, जलयुक्त शिवार, समृद्धी महामार्ग, मेट्रो बंद हे सर्व प्रकल्प बंद केले. या लोकांनी कोविडमध्येदेखील कोविड सेंटरमध्ये, खिचडीमध्ये, डेडबॉडीच्या बॅगमध्ये घोटाळा केल्याचा आरोप मुख्यमंत्री शिंदेंनी केला. त्यामुळे ते दरोडा टाकणारे ते आहेत.

आम्ही अडीच वर्षात विकास केला. कल्याणकारी विकास योजना आणल्या. विकास आणि कल्याणकारी योजना याची सांगड घातली त्यामुळे जनतेला माहित आहे दरोडा कुणी टाकला, असे मुख्यमंत्री म्हणाले. फेक निगेटिव्ह पसरवून मुस्लीम लोकांना घाबरून महाविकास आघाडीने प्रचार केला. संविधान बदलणार हे सर्व सांगून मुसलमान आणि दलितांना महाविकास आघाडीने फसवले. संविधान बदलू शकत नाही, पण फेक नरेटीव्ह यांनी पसरवले, पण आता फसलेले लोकदेखील हुशार झाले हे त्यांना माहिती आहे. ख्रिश्चन, मुस्लिम आणि आदिवासी सर्वांनाच आम्ही पैसे देत आहोत, त्यामुळे आमच्यासाठी सर्व समान आहेत, असेही ते म्हणाले.

### छ. संभाजीनगरमध्ये ठाकरे गटाला धक्का

छत्रपती संभाजीनगरमध्ये ठाकरे गटाला मोठा धक्का बसला. माजी आमदार आणि जिल्हाप्रमुख किशनचंद तनवाणी यांनी ठाकरे गटाला जय महाराष्ट्र केला. किशनचंद तनवाणी यांच्यासोबत १००पेक्षा जास्त आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेमध्ये प्रवेश केला. विधानसभेची उमेदवारी नाकारल्यानंतर जिल्हाप्रमुख पदावरून हटविलेले माजी आमदार किशनचंद तनवाणी हे नाराज होते. अखेर त्यांनी पक्षाला राम राम केला.

## जातवैधता प्रमाणपत्र अर्जदारांसाठी शिबिर

**रायगड : रामप्रहर वृत्त**

शैक्षणिक, सेवा, निवडणूक, इतर प्रयोजनार्थ सादर केलेल्या जातवैधता प्रमाणपत्र प्रस्तावांच्या त्रुटीपूर्ततेच्या अनुषंगाने विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छुक अर्जदारांना अद्याप जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही अशा अर्जदारांसाठी १८ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबरपर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, सेंटमेरी कॅन्व्हेंट स्कूल मागे, चेंढरे अलिबाग येथे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा अर्जदारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती जयंत चाचरकर यांनी केले आहे.

# पालीमध्ये आमदार रविशेठ पाटील यांची भव्य प्रचार रॅली

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील विकास आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आशा पूर्ण करण्यासाठी महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत यायला हवे, असे आवाहन पेण-सुधागड-रोहा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांनी गुरुवारी (दि.१४) पालीमध्ये झालेल्या भव्य प्रचाररॅली वेळी केले.

महायुतीचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांचा प्रचार जोरदार पद्धतीने संपूर्ण मतदारसंघात सुरू आहे. या रॅलीदरम्यान मतदारांनी आमदार रविशेठ पाटील यांना विजयी आशीर्वाद दिले. तरुण वर्ग व महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

आमदार रविशेठ पाटील यांनी लोकप्रतिनिधी म्हणून केलेली कामे आदर्शवत ठरली आहेत. सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून त्यांच्याकडून विधायक कार्य होत आहे. सर्व घटकातील व्यक्तींचा आणि त्यांचा ऋणानुबंध असल्याने प्रचारादरम्यान महायुतीचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांचे जोरदार स्वागत होऊन भरभरून आशीर्वाद मिळत आहेत.



या वेळी खासदार धैर्यशील पाटील, शिवसेना रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रकाश देसाई, भाजप जिल्हा सरचिटणीस गीता पालरेचा, माजी जि. प. अध्यक्ष नीलिमा पाटील, माजी नगराध्यक्ष प्रीतम पाटील, रवींद्र देशमुख, राजेश मपारा, दादा कारखानीस, सुनील राऊत, श्रीकांत ठोंबरे, वैशाली मपारा, महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्जत-खोपोलीदरम्यान विनातिकीट प्रवाशांची धरपकड

## ४० हजारांचा दंड वसूल

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ ते खोपोली स्थानकादरम्यान विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवशांवर बुधवारी (दि.१३) मध्य रेल्वेने कारवाई केली. सुमारे २०० प्रवाशांकडून ४० हजार १०० रुपये दंड मध्य रेल्वे यांनी मुख्य वाणिज्य निरिक्षक शिरीष कांबळे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण तिकिट तपासणीस यांनी रेल्वे प्रशासनाकडे जमा केला, तसेच सर्व स्थानिक पातळीवर विनातिकीट प्रवास करू नये, यासाठी आवर्जून सर्वांना संबोधन करण्यात आले.

लोणावळा विभागाचे मुख्य वाणिज्य निरीक्षक शिरीष कांबळे यांच्या सहकार्याने नेरळ ते खोपोली रेल्वे स्थानकांदरम्यान सकाळी ९ ते १२ वाजेदरम्यान तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. सदर वेळी सुमारे १५१ विनातिकीट रेल्वे प्रवाशांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.



१५१ विनातिकीट रेल्वे प्रवाशांकडून सुमारे ३४ हजार ९० रुपये दंड वसूल केला. सदर तिकीट तपासणी मोहीम प्रसंगी लोणावळा विभागाचे मुख्य वाणिज्य निरीक्षक शिरीष कांबळे, सहा तिकीट तपासणीस, आरपीएफ व जिआरपी कर्मचारी उपस्थित होते.

# माथेरान शहरात महायुतीच्या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**माथेरान : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली असून सगळीकडे प्रचाराला गती आली आहे. कर्जत-खालापूर मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांच्या प्रचारार्थ बुधवारी (दि.१३) माथेरान शहरत प्रचाररॅली काढण्यात आली. फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचे स्वागत करण्यात आले. महायुतीमधील कार्यकर्त्यांसह महिला आघाडीची लक्षणीय उपस्थिती होती. माथेरानमधून महायुतीच्या या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

इंदिरा गांधी नगर येथील गणेश मंदिरात दर्शन घेत प्रचाराला सुरुवात झाली. आमदार महेंद्र थोरवे यांनी सर्व मतदारांच्या भेटीगाठी घेत महायुतीला सहकार्य करून मतदान करण्याचे येथे आवाहन केले. माथेरान शहरातील अनेक विभागातून जोरदार घोषणाबाजी करीत



ही रॅली माथेरानच्या मुख्य बाजारपेठेतील श्रीराम चौकात आली. श्रीराम मंदिरात जाऊन उमेदवार महेंद्र थोरवे यांनी श्रीरामाचे दर्शन घेत मुख्य चौकात छोटेखानी सभा घेतली. सभेला मार्गदर्शन करताना आमदार महेंद्र थोरवे म्हणाले की, मागील काळात माथेरान पर्यटनस्थळाला जवळपास १७५ कोटींचा भरघोस निधी देऊन बहुतांश कामे मार्गी लावलेली आहेत. यापुढेसुद्धा लोकांना अभिप्रेत असणारी आणि येथे पर्यटनवाढीच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी कामे पूर्णत्वास जातील. पर्यटन हंगामात उद्भवणारा पार्किंग प्रश्न असेल आणि येथील पाण्याचा प्रश्न असेल तसेच पर्यायी रस्ते अशा सर्वच समस्या मार्गी लावू असे आश्वासन त्यांनी दिले.

या प्रचार रॅलीमध्ये भाजपचे जिल्हा चिटणीस मंगेश म्हसकर, माथेरान शिवसेना शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी, भाजप शहराध्यक्ष प्रवीण सकपाळ, शहर संघटक मनोज खेडकर, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, संपर्कप्रमुख निखिल शिंदे, उपशहर प्रमुख प्रमोद नायक, महिला आघाडी प्रमुख संगीता जांभळे, भाजप महिला तालुका उपाध्यक्षा प्रतिभा घावरे, संध्या शेलार, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, प्रदीप घावरे, चंद्रकांत जाधव, रुपाली शिंगाडे, वर्षा शिंदे, प्रीती कळंबे, ज्येष्ठ शिवसैनिक ज्ञानेश्वर बागडे, योगेश जाधव, युवा सेना अध्यक्ष गौरांग वाघेला, युवती सेनेच्या अंकिता तोरणे, माथेरान व्यापारी संघटना अध्यक्ष राजेश चौधरी, गीता जाधव, श्रुतिका दाभेकर, शलाका शेलार, योगिता चौगुले, सुहासिनी दाभेकर, उद्योजक भास्कर शिंदे, सामाजिक कार्यकर्ते राकेश कोकळे, नितेश कदम, हेमंत पवार, अनिस शेख, नितीन शहा, संतोष लखन, सागर पाटील यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खोपोली-पेण रस्त्यावर पीकअप-रिक्षाचा अपघात; दोघे गंभीर जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली-पेण रस्त्यावर पिकअप टेम्पो व रिक्षाचा गंभीर अपघात होऊन यात रिक्षाचालक व एक प्रवासी महिला गंभीर जखमी झाली. दोघांना पनवेल एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.

ही अपघाताची घटना ऋषीवन हॉटेलसमोर गुरुवारी (दि.१४) सकाळी ९.३० वा.च्या दरम्यान घडली. या अपघाताने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, पिकअप टेम्पो (एमएच १४ जेएल ७४००) पेणकडून खोपोलीकडे येत असताना टेम्पोचा टायर अचानक फुटल्याने टेम्पो अनियंत्रित झाला व समोरून येणाऱ्या रिक्षा (एमएच ४६ बीपी ८७०२)वर जोरदार आदळला. यामुळे रिक्षाचालक रोहित पाठारे (रा. बीड जांभरुग) व दुर्गा पारखी (रा. शिळफाटा खोपोली) ही प्रवासी महिला गंभीर जखमी झाली. रिक्षामध्ये रिक्षाचालक पाठारे यांचा पाय अडकल्याने मोठ्या प्रयत्नांनंतर त्यांना बाहेर काढून



रुग्णालयात हलवण्यात आले. जखमींना पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

अपघात होताच मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. खोपोली पोलिसांनी पिकअप टेम्पोचालकाला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक शितल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## सहा लाखांची रोख रक्कम चोरणारे दोघे गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील गुजराती साडी सेलच्या दुकानात चोरी करून जवळपास सहा लाख रुपयांची रोख रक्कम लंपास करणाऱ्या दोघा जणांना पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले आहे.

इस्माईल हजारी यांचे मार्केट यार्ड या ठिकाणी गुजराती साडी सेलचे दुकान असून आरोपी मोहम्मद मुर्तुझा अय्युब (वय ३१) व वसीम वकील कुरेशी (वय २४) यांनी आपसांत संगनमत करून सदर साडीच्या दुकानाचे लॉक बनावट चावीने उघडून दुकानातील पेटीमध्ये ठेवलेले पाच लाख ९२ हजारांची रोख रक्कम तसेच दुकानाच्या गल्ल्यामध्ये असलेले पाच हजार रुपये असा मिळून पाच लाख ९७ हजार रुपये चोरून ते पसार झाले होते.

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. तक्रार दाखल होताच वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक प्रकाश पवार, उपनिरीक्षक विनोद लभडे, हवालदार अविनाश गंथडे, नितीन वाघमारे, अमोल डोईफोडे, परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, नाईक विनोद देशमुख, शिपाई चंद्रशेखर चौधरी आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराद्वारे या दोन आरोपींचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले आहे.

# उमेदवारांच्या सौभाग्यवतींकडूनही प्रचार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघात महायुतीतील शिवसेना, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना आणि परिवर्तन विकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढवीत असलेले अपक्ष उमेदवार यांच्यात चुरशीची तिरंगी लढत होणार आहे. या उमेदवारांच्या सौभाग्यवतीसुद्धा प्रचारात उतरल्या आहेत. गावभेटींवर आणि घरोघरी प्रचारावर या सर्व सौभाग्यवतींनी भर दिला आहे.

कर्जत विधानसभा मतदारसंघात महायुतीच्या माध्यमातून शिवसेनेचे आमदार महेंद्र थोरवे निवडणूक रिंगणात यंदा पुन्हा उतरले आहेत. त्यांच्याविरूद्ध महाविकास आघाडीतून उबाठाचे नितीन सावंत निवडणूक लढवीत आहेत, परिवर्तन विकास आघाडीच्या



माध्यमातून अपक्ष निवडणूक लढवित असलेले सुधाकर घारे आपले नशीब अजमावत आहेत. त्यामुळे ही तिरंगी लढत अत्यंत चुरशीची होणार आहे. या तिन्ही उमेदवारांचे कार्यकर्ते आपापल्या जिल्हा परिषद गटामध्ये प्रचार करीत आहेत.

आमदार महेंद्र थोरवे यांच्या सौभाग्यवती मीना थोरवे यांनी महिलांना घेऊन कर्जत-खालापूर तालुक्यात प्रचारदौरे करून मतदारांची भेट घेऊन संवाद साधत आहेत. मीना थोरवे पंचायत समितीच्या माजी सदस्या आहेत. उबाठाचे उमेदवार नितीन सावंत यांच्या सौभाग्यवती रसिका सावंतसुद्धा महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांबरोबर प्रचारकार्यात उतरल्या आहेत. त्या गृहिणी आहेत, तर अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांच्या सौभाग्यवती नमिता घारे यासुद्धा प्रचार करण्यात मागे राहिल्या नसून त्यांनी महिलांबरोबर गावोगाव फिरून प्रचारकार्य करीत आहेत. त्या खांडपे ग्रामपंचायतीच्या सरपंच आहेत. एकंदरीत तिन्ही प्रमुख उमेदवारांच्या सौभाग्यवती प्रचाराची धुरा सांभाळत आहेत.

पान १ वरुन

## पनवेलसह रायगड विकासाचे केंद्र बनणार

गरीब या संकटातून बाहेर आला नाही. स्वातंत्र्यांच्या ७० वर्षानंतरही अन्न, वस्त्र आणि निवारा यासाठी गरीब लोक तरसत होते, पण पहिल्यांदा भाजपप्रणित सरकारने २५ हजार कोटी जनतेला गरिबीच्या दरीतून बाहेर काढले आहे, असे सांगून पंतप्रधान मोदी म्हणाले की, आम्ही पक्की घरे आणि सुरक्षा गरिबांना दिली. शौचालय बांधून देण्याचे काम केले. जलजीवन मिशन अंतर्गत जनतेच्या घरात पाणी पोहचवले. आज सगळ्यांकडे बँक खाते आहे. मजूरही आज युपीएयने पेमेंट करतो. गरीब माणूस स्वतः पुढे जातोय, देशाला पुढे नेतोय. या सगळ्या योजनांचा सगळ्यात मोठा लाभ दलित, आदिवासी आणि मागासलेल्या व्यक्तींना झाला आहे.

जी कामे १० वर्षात झाली ती याआधीही होऊ शकली असती, पण गरीब पुढे येऊन आपला हक्क मागू नये ही मानसिकता काँग्रेसची होती. आम्ही देशातील ८० कोटी जनतेला दर महिना मोफत रेशन देतो. रायगड जिल्ह्यात १८ लाख कुटुंबांना त्याचा लाभ होतोय. या कामाला कुणाला विरोध असावा का? गरिबाच्या घरात चूल पेटली तर आनंद होणार की नाही?, पण काँग्रेसला आनंद होत नाही. गरिबी रेषेतून २५ कोटी बाहेर निघालेत, मग त्यांना मोफत रेशन का दिले जाते, असे काँग्रेस विचारते. जर महाविकास आघाडीला संधी मिळाली तर ते महाराष्ट्रात सर्व लाभ बंद करतील. काँग्रसला थांबवण्याची मोठी जबाबदारी गरिबांवर आहे, असे पंतप्रधान मोदींनी नमूद केले.

या वेळी पंतप्रधानांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला. काँग्रेस नेहमीच आरक्षणाच्या विरोधात राहिली आहे. देशाचा विकास त्यांना नेहमीच खूपत आला आहे. समाजांमध्ये फूट पाडणे आणि सत्ता काबीज करणे हेच त्यांचे आजवरचे धोरण राहिले आहे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गांमधील समाजांना फोडण्याचे षडयंत्र काँग्रेसने रचले आहे, परंतु आम्ही त्यांना यामध्ये यशस्वी होऊ देणार नाही. काँग्रेसचे नेते परदेशांमध्ये जातात आणि खुलेआम घोषणा देतात की, आम्ही आरक्षण संपवून टाकू. आता ते महाविकास आघाडीतील पक्ष महाराष्ट्रातील छोट्या छोट्या जातींमध्ये फूट पाडण्याचे काम करत आहेत, जेणेकरून त्या छोट्या जातींची, समुदायांची राजकीय शक्ती कमी व्हावी आणि ठराविक लोकांनाच सत्तेचा मलिदा मिळावा. काँग्रेसने नेहमीच सत्ता मिळवण्यासाठी समाजा-समाजांचे विभाजन करण्याचा प्रयत्न केला आहे. विकासाऐवजी फोडा आणि राज्य करा ही त्यांची नीती राहिली आहे, याकडे पंतप्रधान मोदींनी लक्ष वेधले.

आज भारत प्रत्येक क्षेत्रात प्रगतीचे नवे रेकॉर्ड बनवत आहे. देशात महिलांना पुढे नेण्यासाठी सरकार महिला सशक्तीकरणाचे धोरण अवलंबत आहे. आमच्या सरकारने पीएम आवास योजना आणली. या घरांची नोंदणी घरातील महिलेच्या नावावर व्हावी असे धोरण आम्ही आणले. आम्ही देशात घरोघरी शौचालय उभारली. काँग्रेसने त्याची खिल्ली उडवली, परंतु महिला सन्मानासाठी ही योजना आम्ही आणली. तीन कोटी महिलांना लखपती दिदी बनवण्याच्या योजनेवर आम्ही काम करतोय. इतक्यावर न थांबता प्रत्येक वर्षी महिलांचे आर्थिक उत्पन्न एक लाख रुपयांहून अधिक बनवण्याचे माझे स्वप्न आहे. महाराष्ट्रात महायुती सरकार महिलांना दुप्पट लाभ देत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या सरकारने आणली, मात्र काँग्रेस आणि आघाडीवाले बहिणींना मिळणाऱ्या योजनेचा विरोध करत आहेत. यांचे लोक ही योजना थांबवण्यासाठी कोर्टापर्यंत गेले. यावरून आघाडीवाल्यांचा हेतू किती धोकादायक आहे याचा विचार करा. भविष्यातील महिलांची प्रगती रोखण्याचा आघाडी प्रयत्न करत आहे, असा आरोप पंतप्रधान मोदींनी केला आहे.

देशातील प्रत्येक नागरिकाने एकसंघ राहिले पाहिजे. त्याचबरोबर तुम्ही फक्त आमदार नाही, तर महाराष्ट्राचा विकास निवडणार आहात. त्यामुळे महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन पंतप्रधानांनी केले.


## म्हसळ्यात मतदान जनजागृती रॅली

**म्हसळा :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात गटविकास अधिकारी एम. के. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. न्यू इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज यांच्या माध्यमातून मतदान जनजागृती रॅली न्यू इंग्लिश स्कूल ते पोलीस ठाणेदरम्यान काढण्यात आली, तसेच सर्व रिक्षाचालक आणि मालकांनाही मतदानाचे महत्त्व सांगून रिक्षावरही स्टिकर लावण्यात आले. या वेळी सईद अहमद कादिरी, पं.स.कक्ष अधिकारी चौधरी, सलीम हसवारे, एचपी गॅस एजन्सीचे सर्व कर्मचारी, ग्रामसेवक पाटील, हनुमंत मोरे, शिक्षण विस्तार अधिकारी अरविंद मोरे, केंद्रप्रमुख नरेश सावंत, देवगावकर उपस्थित होते.

# हिंदूद्वेषी काँग्रेसला घरचा रस्ता दाखवणार -आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

माजी खासदार हुसेन दलवाई आणि काँग्रेस नेत्यांनी पुन्हा एकदा आपल्या अकलेचे तारे तोडले आहेत. हिंदुत्वाची बदनामी हाच काँग्रेसचा कायम अजेंडा राहिला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंदूंना आतंकवाद शिकवतेय, अशी भूमिका काँग्रेसने मांडली. हिंदू आतंकवादी आहेत, आतंकवादात हिंदूंचा सहभाग आहे, अशा पद्धतीची मांडणी सगळ्या काँग्रेसी नेत्यांनी केली. त्यामुळे या हिंदूद्वेषी काँग्रेसला या निवडणुकीत घरचा रस्ता दाखवू, असा इशारा आमदार आशिष शेलार यांनी दिला.



ते पुढे म्हणाले की, केवळ अल्पसंख्याक मतांच्या जीवावर आपले राजकारण पुढे टिकवू पाहणाऱ्या या काँग्रेसचा धिक्कार करावा तेवढा कमी आहे. अशाप्रकारची मांडणी करणारी काँग्रेस हिंदूद्वेष्टी आहे का? हा जनमानसातील प्रश्न आहे. हिंदू सडक्या मनोवृत्तीचा आहे, असे म्हणणाऱ्या शर्जील उस्मानीच्या विरोधात हुसेन दलवाई बोलणार नाहीत, पण देशभक्तीने काम करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदू संघटनांना आतंकवादी म्हणण्याची मजल त्यांनी केली. हा हिंदूद्वेष येत्या काळात काँग्रेसला घरचा रस्ता दाखवेल.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ११९
www.ramprahar.com

शुक्रवार, १५ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२



# पनवेलसह रायगड विकासाचे केंद्र बनणार

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन; खारघरमध्ये महायुतीची भव्य सभा






**पनवेल : हरेश साठे**

**विमानतळ, अटल सेतू, सेमी कंडक्टर, डेटा व एआय केंद्र अशा विविध प्रकल्पांच्या अनुषंगाने रायगड जिल्हा विकासाची गाथा लिहिणार आणि पनवेलसह रायगड भविष्यातील विकासाचे केंद्र बनणार आहे. त्यामुळे या ठिकाणी लाखोंच्या संख्येने रोजगार उपलब्ध होणार आहेत, असे आश्वासक प्रतिपादन देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी (दि. १४) खारघर येथे केले. ते महायुती उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित विशाल सभेत मार्गदर्शन करीत होते.**

### वातावरण मोदीमय

*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रचार सभेतील विचार ऐकण्यासाठी पनवेल, उरण, नवी मुंबईसह, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील विविध मतदारसंघातून भाजप महायुतीचे हजारो कार्यकर्ते गुरुवारी दुपारी खारघर उपनगरामध्ये दाखल झाले. त्यामुळे खारघरमधील वातावरण मोदीमय झाले होते. वंदे मातरम, जय श्रीराम अशा विविध घोषणा देत हे कार्यकर्ते सभेस्थळी येत होते. त्यामुळे एक वेगळाच उत्साह दिसून आला. दरम्यान, २५ हजार कार्यकर्ते एकाच ठिकाणी जमणार असल्याने कार्यकर्त्यांच्या आरोग्यसेवेच्या दृष्टीने वैद्यकीय मदत कक्ष अनेक ठिकाणी उभारण्यात आले होते.*


(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्रपक्षाचे उमेदवार मंत्री रवींद्र चव्हाण (डोंबिवली), आमदार संजय केळकर (ठाणे शहर), आमदार प्रशांत ठाकूर (पनवेल), आमदार गणेश नाईक (ऐरोली), आमदार महेश बालदी (उरण), आमदार मंदा म्हात्रे (बेलापूर), आमदार रविशेठ पाटील (पेण), आमदार महेंद्र थोरवे (कर्जत) यांच्या प्रचारार्थ खारघरच्या सेंट्रल पार्कशेजारील कॉर्पोरेट मैदानावर भव्य विजय संकल्प सभा झाली.

व्यासपीठावर उमेदवारांसोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार श्रीरंग बारणे, खासदार धैर्यशील पाटील, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, आमदार विक्रांत पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, भाजपचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, प्रभाकर कांबळे, भाजपचे पनवेल विधानसभा संयोजक व जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती मनोहर म्हात्रे आदी उपस्थित होते.

### ‘दिबां’चा त्याग व परिश्रम ऊर्जा देतात!

आजची गर्दी २३ तारखेला निकाल काय येणार याची गॅरंटी देत आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यात महायुती आहे, तरच गती आहे आणि महाराष्ट्राची प्रगती आहे असा आवाज येतो. लोकनेते दि.बा. पाटील यांना मी अभिवादन करतो. त्यांचा त्याग आणि परिश्रम महाराष्ट्राला पुढे घेऊन जाण्यात आणखी ऊर्जा देत असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात सांगितले. शिवरायांनी आम्हाला स्वराज्याची शपथ दिली होती. आता स्वराज्याबरोबरच सुराज्य पुढे घेऊन जाण्याची गरज आहे, असेही पंतप्रधान म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठीत करून जय भवानी जय शिवाजी अशी गर्जना केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या पवित्र भूमीला मी हृदयपूर्वक नमस्कार करतो. माझे सौभाग्य आहे की, पुन्हा मला रायगडकरांना नमस्कार करण्याची संधी मिळाली. रायगडसोबत माझे आत्मिक संबंध आहेत. २०१३मध्ये माझे नाव पंतप्रधानपदासाठी जाहीर झाले तेव्हा मी रायगड किल्ल्यावर गेलो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीजवळ बसून जसा भक्त देवाच्या समोर बसतो तसा मी बसलो आणि महाराजांचे आशीर्वाद घेतले. त्याचप्रमाणे अलिकडे गुजरातमध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याला अभिवादन करायला गेलो. तिथे परेडमध्ये रायगडच्या किल्ल्याची प्रतिकृती होती, असे सांगत रायगडचा गौरव दूरवर पोहचला असल्याचे पंतप्रधान मोदींनी अधोरेखित केले.

पंतप्रधान मोदी आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, मुंबईत आज अटल सेतू बनला. त्यामुळे रायगडहून मुंबईला जाणे पूर्वीपेक्षा सुलभ झाले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, वाढवण बंदर, समृद्धी महामार्ग, मुंबई कोस्टल हायवे, पनवेल-कर्जत रेल्वेमार्गाचे विस्तारीकरण यासारख्या कामांमुळे महाराष्ट्राचे चित्र बदलत आहे. रायगड विकासाची नवी व्याख्या लिहितोय. आशियातील दुसरा सर्वात मोठा डेटा पार्क बनतोय. एआय केंद्र रायगडात बनणार आहे. पनवेलमध्ये सेमी कंडेक्टर क्षेत्रात मोठी गुंतवणूक येतेय. पालघर, जेएनपीटी पोर्टने विकासाचे नवीन मार्ग उघडणार आहेत. पनवेल, रायगड, पालघर ही क्षेत्रं भविष्यात नवीन केंद्र असतील. त्यातून राज्यातील लाखो युवकांना रोजगार उपलब्ध होतील. याशिवाय कोकणात तीन नवी बंदरे विकसित होत आहेत. विकसित भारताचे प्रमुख इंजिन महाराष्ट्र बनेल. हा संपूर्ण परिसर समुद्र किनारी आहे. त्यामुळे कोस्टल इकोनॉमीवर सरकार काम करत आहेत.

देशाच्या विकासाचा संकल्प भाजप आणि महायुती सरकारने केला आहे. काँग्रेसने फक्त गरिबाला गरीबच बनवून ठेवले. गरिबी हटावचा खोट्या घोषणा देत काँग्रेसने दिवस घालवले. त्यांनी गरिबांना लुटले. **(पान २ वर..)**

## महायुती सरकारच्या कामगिरीचा सर्वांना अभिमान -आमदार प्रशांत ठाकूर

या वेळी महायुतीचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, अटल सेतू आणि मेट्रोच्या कामाला स्थगिती देण्याचे काम उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारने केले, परंतु देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांनी याकडे विशेष लक्ष देत हे प्रकल्प पूर्णत्वास नेले आणि या प्रकल्पांचा वाहतुकीच्या दृष्टीने नागरिकांना मोठा फायदा होत आहे. विविध योजना आणि प्रकल्पामुळे हा भाग मोठ्या प्रमाणात विकसित झाला असून महायुती



सरकारच्या कामगिरीचा सर्वांना अभिमान आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या पदाची शपथ घेण्यापूर्वी रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांपुढे नतमस्तक होऊन निवडणुकीच्या प्रचाराचा धडाका लावला आणि विजयाचा इतिहास घडवला. २० नोव्हेंबरला प्रत्येक मतदाराने मतदानाचा अधिकार वापरायचा आहे. १० वर्षांचा तुलनात्मक आढावा घेतला तर पंतप्रधान नरेंद्र मोदी, तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विकासाचा आलेख उंचावला आहे. विमानतळ, कॉरिडोर, कोस्टल रोड, अटल सेतू, रस्त्यांचे जाळे निर्माण झाले. जलजीवन योजना आणून पाण्याचा प्रश्न निकाली लागला. लोडशेडिंग बंद झाले. मेट्रो सुरू झाली. गरजेपोटी घरे नियमित करण्याचा निर्णय झाला, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधोरेखित केले.

पनवेल महापालिकेच्या मालमत्ता करासंदर्भात विरोधकांनी नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण केला, न्यायालयात गेले. हेच विरोधक महाविकास आघाडीवाले सत्तेत होते त्या वेळी मालमत्ता कराबाबत का निर्णय घेऊ शकले नाही, असा सवालही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी उपस्थित केला तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मालमत्ता करावरील शास्ती माफ करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबद्दल त्यांचे आभार मानले.

## निवडक

### बाबा सिद्दिकींचे मारेकरी रुग्णालयातही गेले होते!

**मुंबई** : माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्या प्रकरणात नवी माहिती समोर आली आहे. गोळीबारानंतर सिद्दिकींचा मृत्यू झाला आहे की नाही याची खात्री करून घेण्यासाठी आम्ही तिथे गेलो होतो. ते बचावण्याची शक्यता फारच कमी असल्याची माहिती मिळाल्यानंतर आम्ही तिथून बाहेर पडलो व फरार झालो, असे मुख्य मारेकरी शिव कुमार गौतम उर्फ शिवा याने पोलीस चौकशीत सांगितले.

### शिवाजी पार्कवर राज ठाकरे यांचीच गर्जना, सभेला परवानगी

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीसाठी १८ नोव्हेंबर रोजी राज्यभरात मोठ्या प्रचारतोफा धडाडणार आहेत. मुंबईत शेवटची सभा शिवाजी पार्क मैदानावर घेण्यावर दोन्ही ठाकरे बंधू आग्रही असताना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या सभेला येथे परवानगी देण्यात आली आहे. या परवानगीसाठीचा अर्ज मनसे पक्षाकडून आधी देण्यात आल्याने नियमानुसार ही परवानगी दिल्याचे सांगण्यात आले.

## निवडणूक गैरप्रकारासाठी १२५ कोटी रुपयांचा वापर

### ‘ईडी’चे महाराष्ट्रात २४ ठिकाणी छापे

**मुंबई : प्रतिनिधी**

मालेगाव येथील एका व्यापाऱ्याने निवडणुकीतील गैरप्रकारांसाठी पैशांचा गैरवापर केल्याच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) बुधवारी ठाणे, वाशी, मालेगाव, नाशिक, सुरत आणि अहमदाबादमध्ये व्यापारी आणि बनावट कंपन्यांशी संबंधित २४ ठिकाणी छापे टाकले. या प्रकरणात बँक खाती आणि १२५ कोटी रुपयांचा गैरवापर वापर केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी ईडी अधिक तपास करीत आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मालेगाव येथील सिराज अहमद हॅरुन मेमन याने एकापेक्षा जास्त बँक खाती उघडल्याशी संबंधित छापे टाकण्यात आले आहेत. मेमनला स्थानिक पोलिसांनी अटक केली आहे. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी गुरुवारी सकाळी या प्रकरणाला ‘वोट जिहाद फंडिंग’ गैरव्यवहार असे म्हटले आहे तसेच या बेनामी बँक खात्यांमधून पैसे काढून निवडणुकीत गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. सोमय्या यांनी मालेगाव पोलिसांकडे या आरोपांसाठी तक्रार केली आहे. सिराज मोहम्मदच्या २४ बेनामी बँक खात्यांसह मालेगाव, नाशिक येथील दोन बँकांमध्ये पोलीस, ईडी, प्राप्तिकर विभाग, आरबीआय, निवडणूक आयोग तपास करीत आहेत, असे त्यांनी एक्स या समाजमाध्यमावर पोस्ट केले आहे.

मालेगाव पोलिसांनी ७ नोव्हेंबर रोजी सिराजविरोधात दाखल केलेल्या गुन्ह्याच्या आधारे ईडीने कारवाई सुरू केली आहे. मालेगावमधील ११ स्थानिकांनी केलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी सिराजवर गंभीर आरोप असून त्याला अटकही करण्यात आली आहे. सिराज बँक खात्यांचा वापर निवडणुकीसाठी करीत असल्याचा आरोप आहे. सिराजने मालेगावमधील नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेत अनेक बँक खाती उघडली होती. यामध्ये नागरिकांच्या केवायसी कागदपत्रांचा वापर करून शेतकऱ्यांना पैसे पाठवण्यासाठी नवा व्यवसाय सुरू करत असल्याचे भासवले होते.

सिराजने कृषी व्यवसायासाठी बँक खाती उघडण्यासाठी सांगितले व त्या बदल्यात त्याने कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये काम देण्याचे आश्वासन दिले होते, असे तक्रारदार जयेश मिसाळ यांनी पोलिसांना सांगितले. सिराजने मिसाळ यांच्याप्रमाणेत इतर ११ जणांची बँकेत खाती उघडली. या खात्यांमध्ये कोट्यवधी रुपये जमा झाल्याचे आणि ते अन्य खात्यात वळविण्यात येत असल्याचे नंतर मिसाळ आणि अन्य खातेदारांच्या लक्षात आले. या प्रकाराचा मिसाळ आणि इतर खाताधारकांना धक्का बसला. त्यांनी या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार केली. सिराजने आपल्या बँक खात्यांचा गैरवापर करून त्यात बेकायदेशीरपणे पैसे हस्तांतरित केल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे.

गेल्या दोन महिन्यांत १० ते १२ बँक खाती उघडण्यात आली होती. ईडीने या खात्यांमधील व्यवहारांची माहिती घेतली तेव्हा त्यात १२५ कोटी रुपयांचे व्यवहार आढळले. निवडणुकीसाठी या रकमेचा वापर होत असल्याचा आरोप असून याबाबत ईडी तपास करीत आहे.



## साजगावची यात्रा दोन दिवस राहणार बंद

**चौक : प्रतिनिधी**

ताकई साजगाव (ता. खालापूर) येथील १५ दिवस चालणारी यात्रा ही पोलीस मनुष्यबळाच्या व्यस्त दिनक्रमामुळे १९ व २० नोव्हेंबर या दोन दिवसांकरिता बंद ठेवण्यात येणार आहे. या काळात दर्शन व्यवस्था सुरू असेल, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी स्पष्ट केले आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीदरम्यान गर्दीचे नियोजन आणि सार्वजनिक वाहतुकीची व्यवस्था राखण्यात पोलीस मनुष्यबळ व्यस्त आहे. २० नोव्हेंबर मतदान प्रक्रिया होणार आहे. त्यामुळे तो व त्याच्या आधीचा एक असे दोन दिवस मनोरंजनाचे सर्व खेळ व दुकाने बंद ठेवण्यात यावीत, असा मनाई आदेश जारी करण्यात आला आहे.

## संपादकीय

# काँग्रेस देशहित विरोधी

सत्तेसाठी आसुसलेला काँग्रेस पक्ष आपणच गरिबांचे तारणहार आहोत असा आव आणत असला तरी स्वातंत्र्यानंतर प्रदीर्घ काळ सत्ता उपभोगताना काँग्रेसने गरिबांसाठी काय केले, असा रोखठोक सवाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खारघरच्या सभेत केला. देशहिताच्या आड येण्यापासून काँग्रेसला रोखण्याची जबाबदारी जनतेची आहे या मोदींच्या आवाहनाला जनता नक्कीच प्रतिसाद देईल.

**रायगडसोबत माझे भावनिक नाते आहे. शिवछत्रपतींच्या या पवित्र भूमीला मी नमन करतो, असे मराठीत म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, २०१३ मध्ये भाजपने त्यांचे नाव पंतप्रधानपदासाठीचे उमेदवार म्हणून जाहीर केले तेव्हाच्या त्यांच्या रायगड किल्ल्याच्या भेटीची आठवण खारघरमधील भाषणाच्या प्रारंभीच जागवली. जसा भक्त देवाच्या समोर बसतो तसे आपण शिवाजी महाराजांच्या समाधीसमोर बसलो होतो असेही मोदींनी या वेळी सांगितले. स्वर्गीय दि. बा. पाटील यांनाही पंतप्रधानांनी अभिवादन केले. त्यांचा त्याग व परिश्रम आजही महाराष्ट्राला पुढे जाण्यासाठी आवश्यक ऊर्जा देत आहेत असेही मोदी म्हणाले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार रवीशेठ पाटील व रायगड जिल्ह्याचे आधारस्तंभ लोकनेते रामशेठ ठाकूर व्यासपीठावर उपस्थित होते. पंतप्रधान मोदी यांनी सभेतील अलोट गर्दी पाहून, २३ तारखेला निकाल काय असेल याची गॅरंटी वाटते अशी टिप्पणीही केली व महाविकास आघाडीच्या निष्क्रीय कारभारावर जोरदार टीका केली. या आघाडीने आपल्या कार्यकाळात महाराष्ट्रातील विकास प्रकल्प रखडवण्याचे काम तेवढे केले. काँग्रेस पक्षाला तर विकासकामांना ब्रेक लावण्याचा पूर्वानुभवच आहे. महाविकास आघाडीच्या स्थगितीच्या कालखंडातून महायुतीने महाराष्ट्राला बाहेर काढले व गतिमान प्रशासन म्हणजे काय याचा प्रत्यय जनतेला दिला. त्यामुळेच आज राज्याच्या कानाकोपऱ्यात महायुती आहे तरच गती आहे, प्रगती आहे, असा आवाज येतो. जनतेला महाराष्ट्राला असेच वेगाने विकासाच्या मार्गावर नेणारे सरकार हवे आहे म्हणूनच ते महायुतीकडे आशेने पाहात आहेत. शिवरायांनी आपल्याला स्वराज्याची शपथ दिली होती. आता स्वराज्याबरोबरच सुराज्यही पुढे घेऊन जाण्याची गरज आहे. सुराज्याचा संकल्प केवळ भारतीय जनता पक्ष आणि महायुतीच तडीस नेऊ शकते असे म्हणत मोदींनी काँग्रेसवर टीकेचा घणाघात केला. प्रदीर्घ काळ सत्तेवर राहिलेल्या काँग्रेस पक्षाने देशातील गरिबीचे कितपत निवारण केले? का काँग्रेसी सरकारांनी निव्वळ 'गरिबी हटाव'च्या घोषणा देण्यातच धन्यता मानली, असा रोखठोक सवाल मोदींनी केला. खरे तर जनतेलाही हाच प्रश्न पडलेला आहे. आजच्या घडीला देशातील ८० कोटी लोकांना मोफत रेशन दिले जाते. रायगड जिल्ह्यात १८ लाख लोकांना मोफत रेशन योजनेचा लाभ मिळतो आहे. भाजप सरकारच्या अशा कामांना काँग्रेसचा विरोध का? मोदी सरकारने गरिबांना घरे आणि शौचालये बांधून दिली. जलजीवन मिशनने १२ कोटी जनतेच्या घरात पाणी पोहचवले. मोदी सरकारच्या प्रयासांमुळेच आज सगळ्यांकडे बँक खाते आहे. एखादा मजूरही आज युपीआयने पैसे देतो-घेतो. देशाला प्रगतीपथावर नेण्यात या गरीब श्रमिकाचाही मोठा वाटा आहे हे मोदींचे म्हणणे खरेच आहे. आपल्या सरकारच्या सर्व योजनांचा मोठा लाभार्थी दलित, आदिवासी आणि मागास जनता राहील याची काळजी मोदी सरकारने नेहमीच घेतली आहे. रायगड जिल्ह्यातही नवी मुंबई विमानतळासारख्या विकासकामाचा मोठा लाभ स्थानिकांना मिळणार आहे. त्यामुळेच महायुती तिथे प्रगती याची निश्चित खात्री जनतेला वाटते आहे.**

# महेंद्र दळवी सलग दोनदा निवडून येण्याचा इतिहास घडवणार?

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**



अलिबाग विधासनसभा मतदरसंघ हा शेकापचा बालेकिल्ला. शेकापचा येथे चार वेळा पराभव झाला आहे, परंतु या मतदारसंघात शेकापचा विरोधी उमेदवार सलग दोनवेळा निवडून आलेला नाही. या वेळी महायुतीचे उमेदवार शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी या मतदारसंघातून सलग दोन वेळा निवडून येण्याचा इतिहास घडवतात का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पुरुष मतदारांच्या तुलनेत महिला मतदारांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे महिला मतदारांचा कौल सर्वच मतदारांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

यंदा अलिबाग विधानसभा मतदारसंघात ११ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत, असे असले तरी महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र दळवी, महाविकास आघाडीच्या उमेदवार शेकापच्या चित्रलेखा पाटील, अपक्ष उमेदवार दिलीप भोईर या तिघांमध्ये खरी लढत असेल. अलिबाग विधानसभा मतदारसंघांवर कायमच शेकापचे वर्चस्व राहीले आहे, मात्र गेल्या पाच वर्षांत या मतदारसंघात अनेक नेते शेकाप सोडून गेले. माजी आमदार पंडित पाटील यांना या मतदारसंघातून पुन्हा उमेदवारी हवी होती किंवा राजिपचे माजी उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील यांना उमेदवारी द्यावी, अशी पंडित पाटील यांची मागणी होती, परंतु शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी पंडित पाटील व ॲड. आस्वाद पाटील यांना डावलत आली सून चित्रलेखा पाटील यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पंडित पाटील व ॲड. आस्वाद पाटील नाराज झाले. ते प्रचारपासून दूर राहीले आहेत. त्याचा फटका शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांना बसू शकतो.

चित्रलेखा पाटील यांना उमेदवारी देण्याचा आपला निर्णय कसा योग्य होता हे सिध्द करण्याची जबाबदारी जयंत पाटील यांच्यावा आहे. एकदम प्रतिकूल परिस्थितीत शेकाप ही निवडणुक लढवत आहे. ही निवडणूक शेकापसाठी अस्तित्वाची लढाई आहे. या निवडणूकीत पराभव झाल्यास शेकाप पुन्हा उभा राहणे फार कठीण आहे. हे शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनादेखील माहीत आहे. या निवडणूकीत त्यांची सून उमेदवार असली तरी या निवडणूकीतल पराभव हा त्यांचा पराभव असले. त्यामुळे जयंत पाटील यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गटाने उभे केलेले उमेदवार मागे घेऊन शेकापच्या उमेदवाराला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे शेकापला मोठा दिलासा मिळाला आहे. काँग्रेसचे नेतेदेखील चित्रलेखा पाटील यांचा प्रचार करत आहेत. हे दोन्ही पक्ष शेकापचे परंपरागत विरोधी पक्ष राहिले आहेत. नेते सोबत आले तरी कार्यकर्ते योबत येण कठीण आहे. त्यामुळे त्यांची मते शेकापकडे वळविण्याचे आव्हान शेकापसमोर आहे.

अलिबाग, मुरुड आणि रोहा तालुक्यातील चणेरा विभाग यांना मिळून अलिबाग विधानसभा मतदारसंघ तयार झाला आहे. मतदारसंघात तीन लाख सहा हजार २३० मतदार आहेत. यात एक लाख ५० हजार ५४३ पुरूष तर एक लाख ५५ हजार ६८६ महिला मतदारांचा समावेश आहे. पुरुष मतदारांच्या तुलनेत महिला मतदारांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे महिला मतदारांचा कौल सर्वच मतदारांसाठी महत्वाचा ठरणार आहे. शेकापने महिला उमेदवार दिला आहे. त्याचा थोठा फायद्या चित्रलेखा पाटील यांना होऊ शकतो.

अलिबाग तालुक्यात शेकापची ताकद आहे, परंतु मुरूड तालुक्यात शेकापची आता पूर्वी इतकी ताकद राहलेली नाही. मुरूड तालुक्यात शेकाप कमकुवत झाला आहे. त्याचा फायदा महेंद्र दळवी यांना होईल. विद्यमान आमदार महेंद्र दळवी यांचा गेल्या पाच वर्षांतील मतदारसंघावरचा प्रभाव लक्षात घेतला तर, दळवी यांचे हे आव्हान थोपवणे सोपे असणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची साथ आणि भाजपने संपूर्ण पाठींबा दिला आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनीदेखील महायुतीचे उमेदवार महेंद्र दळवी यांचा प्रचार करा, असे आदेश भाजपच्या कार्यकर्त्यांना दिले आहेत. भाजपचे कार्यकर्तेदेखील पूर्ण ताकदीने दळवी यांचा प्रचार करत आहेत. ही महेंद्र दळवी यांच्या जमेची बाजू आहे.

रायगड जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर शेतकरी कामगार पक्षातून भाजपमध्ये आले. ते भाजपकडून निवडणूक लढविण्यास इच्छूक होते, परंतु ही जागा शिवसेनेला सूटल्यामुळे त्यांना भाजपने उमदेवारी दिली नाही. त्यामुळे त्यांनी अपक्ष निवडणूक लढविण्याचा निर्णय घेता. भोईर यांनी गेल्या दोन वर्षांत मतदारसंघाची बांधणी केली. भोईर हे आदिवासी आणि कोळी समाजात ते चांगले लोकप्रिय आहेत. त्यांना मानणारा मोठा गट आहे. त्यामुळे त्यांच्या उमेदवारीची शेकाप आणि शिवसेना शिंदे गट दोघांनाही धास्ती घेतली आहे. दिलीप भोईर यांनी आपला उमेदवारी अर्ज भरताना मोठी गर्दी करून आपली ताकद दाखवून दिली होती.

सुरूवातीला अलिबाग मतदारसघातील निवडणूक एकतर्फी वाटत होती, परंतु दिलीप भाईर यांच्या उमेदवारीमुळे या मतदारसंघातील निवडणूकीत चुरस निर्माण झाली आहे. ते निवडून आले नाहित तरी त्यांना मिळणारी मते कुणाच्यातरी पराभावस कारणीभूत ठरणार आहेत. भोईर यांना हलक्यात घेऊन चालणार नाही. ते किती मत घेतात यावर या मतदारसंघाचा निकाल अवलंबून राहणार आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत अलिबाग विधानसभा मतदारसंघातून महायुतीच्या सुनील तटकरे यांना ३८ हजार ९९६ हजारांचे मताधिक्य मिळाले होते. तटकरे यांना १,१२,६५४ तर अनंत गीते यांना ७३,६५८ मते पडली होती. ही आघाडी पहाता महेंद्र दळवी यांना ही निवडणूक अवघड आहे, असे वाटत नाही, परंतु गाफिल राहून चालणार नाही. महेंद्र दळवी यंदा निवडू आले तर या मतदारसंधातून शेकापचा उमदवार सोडून इतर पक्षाचा उमेदवार सलग दोन वेळा निवडून येण्याचा इतिहास ते घडवतील.

# थोर क्रांतिकारक वीर बिरसा मुंडा



बिरसा मुंडा यांचा आज स्मृतिदिन. बिरसा मुंडा हे एक भारतीय आदिवासी क्रांतिकारक होते. ते आदिवासी समाजाचे वीर नायक होते. १९व्या शतकातील शेवटच्या वर्षात मुंडा जमातीच्या आदिवासींकडून इंग्रज सरकारविरुद्ध जनआंदोलने केली, त्याचे नेतृत्व बिरसा मुंडा यांनी केले होते. त्यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील उलीहातू येथे झाला. त्यांचे बालपण इतर मुंडा आदिवासी मुलांप्रमाणेच जंगलात व ग्रामीण भागात व्यतीत झाले. पुढे मुंडा प्रसिद्ध वैष्णव भक्त आनंदानंद पांडे यांच्या संपर्कात आले.

वाचन व लेखन येत असल्याने त्यांनी महाभारत, रामायण व गीता असे अनेक हिंदू धार्मिक ग्रंथांचे वाचन केले. त्यांच्यासोबत राहून इंग्रजांच्या काळ्या धोरणाचा त्यांना फार तिरस्कार यायचा. बिरसा मुंडा यांनी १९०० मध्ये इंग्रजांविरूद्ध विद्रोह करण्याची घोषणा केली व म्हटले 'आम्ही ब्रिटिश शासनाच्या तत्वांविरुद्ध विद्रोहाची घोषणा करतो. आम्ही कधीच ब्रिटिशांच्या कायद्यांना मानणार नाही. आम्ही इंग्रजांचे अधिपत्य स्वीकारत नाही.

जो इंग्रज आमच्याविरुद्ध उभा राहील त्यास आम्ही यमसदनी पाठवू. यामुळे संतप्त ब्रिटिश सरकारने आपली सेना बिरसा मुंडा यास पकडण्यासाठी पाठविली. बिरसा मुंडा यांनी विविध जमातीच्या गटांना एकत्र आणले. त्यांना इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रेरित केले. इंग्रज सरकारने बिरसा मुंडा यास अटक केली. त्यांच्यासोबत ४६० आदिवासी युवकांनाही अटक करण्यात आली. अशा या थोर क्रांतिकारकाचे ९ जून १९०० रोजी निधन झाले.

बिरसा यांच्या आंदोलनाची ब्रिटिशांना गंभीरपणे दखल घ्यावी लागली. ब्रिटिशांनी 'छोटा नागपूर टेनन्सी क्टख्र मंजूर करून आदिवासींचे जमिनीवरील हक्क मान्य केले. आदिवासी-हक्क, स्त्री-स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा यांच्यासाठी लढा देणारा पहिला आदिवासी नेता म्हणून बिरसा यांची ओळख आहे. देशभरात विशेषता बिहार, ओडिसा, झारखंड, छत्तीसगड, प. बंगाल या भागात बिरसा मुंडा यांना क्रांतीसूर्य मानलं जातं. १५ नोव्हेंबरला बिरसा मुंडा यांची जयंती आदिवासी बांधव साजरी करतात.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# 'ट्राय'ची मोठी कारवाई! १.७७ कोटी सिमकार्ड ब्लॉक



सरकारी दूरसंचार विभागाने बनावट कॉल्स रोखण्यासाठी कठोर पावले उचलली आहेत. अलीकडेच विभागाने १.७७ कोटी मोबाईल नंबर बंद केले आहेत. हे नंबर बनावट कॉल करण्यासाठी वापरले जात होते. देशातील १२२ कोटींहून अधिक दूरसंचार युजर्सच्या सुरक्षेसाठी दूरसंचार विभाग आणि भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण (TRAI) सहकार्याने हे पाऊल उचलले आहे.

दूरसंचार विभाग आणि ट्रायने संयुक्तरित्या बनावट कॉल्सविरोधात कारवाई तीव्र केली आहे. ट्रायने गेल्या महिन्यातच एक नवीन धोरण तयार केले आहे, ज्याद्वारे आता ऑपरेटर स्वत:च मार्केटिंग आणि बनावट कॉल्स थांबवू शकतात. यामुळे आता व्हॉईसलिस्टिंगची गरज भासणार नाही.

दूरसंचार विभागाच्या म्हणण्यानुसार, दररोज जवळपास १.३५ कोटी बनावट कॉल्स थांबवले जात आहेत. याशिवाय, विभागाने बनावट कॉल करणारे १.७७ कोटी मोबाईल नंबर बंद केले आहेत. लोकांच्या तक्रारींवर विभागाने कारवाई करत पाच दिवसांत सुमारे ७ कोटी कॉल्स बंद केले आहेत. ही आपल्या मोहिमेची सुरुवात असल्याचे विभागाने म्हटले आहे.

**बनावट कॉल्सवर आळा बसेल**


दूरसंचार विभागाने बनावट कॉल करणाऱ्यांना रोखण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही विभागाने लाखो सिमकार्ड बंद केले होते. बनावट कॉल्स रोखण्यासाठी विभाग कठोर पावले उचलत आहे. तसेच, आतापासून, कॉलर्सना फक्त व्हाइटलिस्ट असलेले टेलीमार्केटिंग कॉल प्राप्त होतील.

**११ लाख खाती गोठवण्यात आली**

अलीकडेच, दूरसंचार मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, जवळपास ११ लाख खाती बँकांनी आणि पेमेंट वॉलेटद्वारे गोठवली आहेत. येत्या काही दिवसांत आणखी सिमकार्ड ब्लॉक केले जातील, असे सरकारचे म्हणणे आहे. दूरसंचार विभाग (DOT) सोबत काम करणाऱ्या चार दूरसंचार सेवा ऑपरेटरने (TSPs) ४५ लाख बनावट आंतरराष्ट्रीय कॉल्स दूरसंचार नेटवर्कपर्यंत पोहचण्यापासून रोखले होते.

# भूदान चळवळीचे प्रणेते विनोबा भावे

**निमित्त**



भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज पुण्यतिथी. रायगड जिल्ह्याच्या पेण तालुक्यातील गागोदे या गावी विनोबा तथा विनायक नरहरी भावे यांचा जन्म झाला. त्यांच्या आजोबांचे नाव शंभुराव भावे. शंभुरावांचे जन्मगाव वाई. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. आजोबा आणि मातुश्रींपासून धर्मपरायनतेचे संस्कार विनोबांना मिळाले.

विनोबा भावे यांचे वडील नरहरी शंभुराव भावे व आई रूक्मिणीबाई हे नोकरीच्या निमित्ताने बडोदे येथे गेले. विनोबांचे माध्यमिक आणि उच्च शिक्षण बडोदे येथेच झाले. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईस जाण्यास निघाले, परंतु वाटेतच सुरतेस उतरून आईवडिलांना न कळविताच वाराणसी येथे रवाना झाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते. एक हिमालय व दुसरे बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदुविश्वविद्यालयातील एका समारंभात महात्मा गांधीचे भाषण झाले. त्याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला.

हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती यांच्या दोन्ही प्रेरणा महात्मा गांधीच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्त्वात त्यांना आढळल्या. महात्मा गांधींशी पत्रव्यवहार केला. महात्मा गांधींची कोचरब आश्रमात ७ जून १९१६ रोजा भेट घेतली आणि तेथेच त्या सत्याग्रहश्रमात नैष्ठिक ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करून जीवनसाधना सुरू केली. ऑक्टोबर १९१६ रोजी महात्मा गांधींची एक वर्षांची रजा घेऊन ते वाई येथे प्राज्ञपाठशाळेत वेदान्ताच्या अध्ययनाकरिता उपस्थित झाले. ब्रह्मविद्येची साधना त्यांचा जीवनोद्देश होता.

१९३२ सालच्या सविनय कायदेभंगाच्या सामुदायिक आंदोलनात विनोबांनी भाग घेतला. त्यांनी धुळे कारागृहामध्ये शिक्षा भोगली. सुप्रसिद्ध गीताप्रवचने या कारागृहात त्यांनी दिली. शंभरापेक्षा अधिक सत्याग्रही कैदी आणि इतर गुन्ह्यांस्तव शिक्षा झालेले कैदी या प्रवचनांच्या रविवारच्या सभेत उपस्थित असत. त्यांमध्ये शेठ जमनालाल वजाज, गुलजारीलाल नंदा, अण्णासाहेब दास्ताने, साने गुरूजी इ. मंडळी उपस्थित असत.

वैयक्तिक सत्याग्रहानंतर ७ मार्च १९५१ पर्यंत पवनार येथील परंधाम आश्रमातच विनोबांनी शारीरिक आणि मानसिक तपश्चर्येत जीवन व्यतीत केले. १९३६ पासून म. गांधी साबरमतीचा आश्रम सोडून सेवाग्रामला म्हणजे पवनारजवळच येऊन राहिले. त्यामुळे गांधी आणि विनोबा यांचा चिरकाल संवाद चालू राहिला. गांधीच्या देहान्तानंतर सर्वसेवासंघ व सर्वोदय समाज या संस्थांची स्थापना झाली. मार्च १९४८ मध्ये विनोबा दिल्ली येथे जवाहरलाल नेहरू यांच्या विनंतीवरून गेले. भारत-पाक फाळणी झाल्यानंतर परागंदा झालेले लक्षावधी शरणार्थी (सर्व बाजूंनी जीवन उद्ध्वस्त झालेले) दिल्ली, पंजाब, राजस्थान यांमध्ये आले. त्यांना धीर देण्याकरता विनोबांना पंडितजींनी बोलावून घेतले. या दौऱ्यात सर्वधर्मसमभावाचा आदेश देऊन प्रेम आणि सद्भावना निर्माण करण्याचा प्रयत्न विनोबांनी केला.

१५ नोव्हेंबर १९८२ रोजी सकाळी ९.४० वाजता पवनार येथे परंधाम आश्रमात सतत सात दिवस प्रायोपवेशन करून भूदान नेते आचार्य विनोबा भावे यांचे वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले. विनोबांनी प्रायोपवेशनाच्या द्वारे देहत्याग केला. भारत सरकारने विनोबांना भारतरत्न (मरणोत्तर, १९८३) हा किताब देऊन त्यांचा गौरव केला.

**-साभार इंटररनेट**

**क्लिक...क्लिक...!**



पनवेल : ग्रामीण भाग निसर्गाने नटलेला असतो. तलाव व त्यामध्ये पडलेले नारळाच्या झाडाचे प्रतिबिंब यातून त्याची झलक दिसून येते.

## आरोग्य प्रहर

# आवळा खा आणि आजारांना दूर ठेवा!

आवळा म्हणजे खरंतर भारतीय आयुर्वेद आणि पाकशास्त्रच लाडकं फळ. आवळ्याचा रस, आवळ्याचा कीस, आवळ्याचे सरबत, आवळ्याचे लोणचे, पाकातील आवळा, आवळा पवार. आवळा च्यवनप्राश कोणत्याही स्वरूपात आवळा वापरता येतो आणि गुणकारी असतो.



आवळ्यातील बायो-ॲक्टिव्ह कंपाऊंड ट्रायग्लिसेराईड्सचे प्रमाण कमी करतात तसेच चांगले कोलेस्ट्रॉल म्हणजे एचडीएल (हाय डेन्सिटी लिपोप्रोटीन- चांगले कोलेस्टेरॉल)चे प्रमाण वाढवतात. लो-डेन्सिटी लिपोप्रोटीन (ज्याने शरीरातील रक्तवाहिन्या जाडसर होऊ शकतात असे कोलेस्टेरॉल) त्यांचेदेखील प्रमाण कमी करतात. यासोबत वाढलेले कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी करण्याचे प्रमाण आवळ्यामुळे केले जाते.

आवळ्याचा आणखी एक फायदा म्हणजे आवळा हा मधुमहींसाठी अत्यंत गुणकारी आहे. आवळ्यामध्ये असणाऱ्या एलेजीक ॲसिड आणि जीवनसत्व क मुळे शरीरातील साखरेचे प्रमाण अत्यंत संतुलित प्रमाणात राहिले राखले जाते. विशेषतः अमाईलेज आणि ग्लुकोज या दोघांचे शरीरातील संतुलन राखण्यासाठी आवळा गुणकारी आहे.

मधुमेह असणाऱ्यांसाठी आवळ्याचा रस किंवा आवळ्याचा अर्क हा शरीरातील ग्लुकोज आणि ट्रायग्लिसेराईडचे प्रमाण कमी करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. ज्यांचे सिरम इन्सुलिन वाढलेले असते त्यांच्यासाठी आवळ्याचा रस अत्यंत गुणकारी आहे रोज किमान १०० ते ३०० मिली इतका आवळ्याचा रस नियमितपणे प्यायल्यामुळे शरीरातील इन्सुलिनचे प्रमाण संतुलित राखण्यास मदत होते. याव्यतिरिक्त आवळा हा अत्यंत उपयुक्त फळ आहे. आवळ्यामुळे शरीरातील पेशींचे आरोग्य सुधारते तसेच पेशींचे आवरणदेखील अत्यंत तंदुरुस्त होऊन जाते.

ज्यांना श्वसनाचे विकार आहेत किंवा ज्यांना हृदयरोग आहेत त्यांना हृदयाचे आरोग्य सुधारण्यासाठी आवळ्यासारखे फळ नाही. शरीरामध्ये जर कोणत्याही प्रकारच्या आम्लांचे असंतुलन असेल तर आवळा अत्यंत गुणकारी आहे. वजन कमी करण्याच्या अनेक औषधांमध्ये आवळ्याचा अर्क वापरला जातो. लहान मुलांचे पचन स्वास्थ्य वाढविण्यासाठी रोज एक चमचा आवळा खाण्यात असायला हवा. ज्या स्त्रियांना केस गाळण्याची समस्या आहे त्यांनी रोज एक आवळा नियमित खाल्ल्यामुळे उत्तम फरक दिसून येतो. त्वचेच्या विकारांमध्ये आवळा अत्यंत गुणकारी आहे.

**जोडपत्र ४७**
**प्रपत्रे क– १ ते सी ८ आणि क / सीएअ**
**प्रपत्र क – १**

(उमेदवाराने वृत्तपत्रे, दूरदर्शनवर प्रसिद्ध करण्यासाठी)

**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाऊंडेशन आणि इतर विरूद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार

उमेदवाराचे नाव व पत्ता : प्रशांत रामशेठ ठाकूर,
श्री सदन, प्लॉट नं. ५८ ए, मिडलक्लास को. ऑ. हौ. सोसायटी, पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६ .

राजकीय पक्षाचे नाव : भारतीय जनता पार्टी :
(अपक्ष उमेदवारांनी येथे ''अपक्ष'' असे लिहावे )

निवडणूकीचे नाव : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

मतदारसंघाचे नाव : १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघ

मी, प्रशांत रामशेठ ठाकूर (उमेदवाराचे नाव) वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चरित्रवद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे :–

(अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे ) थोडक्यात वर्णन |
|---|---|---|---|
| १ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, बेलापूर | SCC. No. 3833/2023 सीबीडी, बेलापूर, पोलीस स्टेशन FIR No-CR No. 101/2022 FIR Date - 24/06/2022 | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे . अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही . याप्रकरणातील लागू कायद्याची कलमे पुढीलप्रमाणे :– भारतीय दंड संहिता कलम १४३, १४५, १८८, ३४१ महाराष्ट्र पो. का. क ३७ (१) (३), १३५, ३३ पोलीस स्टेशनचे हद्दीत, दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कृती समितीचे नमुद प्रमुख कार्यकर्ते व इतर २००० ते २५०० यांनी त्यांचे आंदोलनास परवानगी नाकारली असताना देखील तसेच कोणत्याही प्रकारची लाऊड स्पिकर परवानगी नसताना त्यांना एकत्र जमू नये असे कळविले असतानाही त्यांनी बेकायदेशीर जमाव जमवून रस्त्यावर स्टेज घालून वाहतुकीस अडथळा निर्माण केला व मा. पो. आयुक्त नवी मुंबई यांच्याकडील पोआ / नमुं / विशा / मआ ३१३८ / २०२२ दि. १३/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र पो. अधि. १९५१ चे कलम ३७ (१) (३) १३५ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेले प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केले म्हणून गुन्हा |
| २ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, उरण | SCC. No. 38/2023 उरण, पोलीस स्टेशन, उरण, जि. रायगड FIR No-CR No. 55/2022 FIR Date - 17/03/2022 | सदरचा गुन्हा नमुद न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असून आरोपीवर समन्स काढणेवर आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. याप्रकरणातील लागू कायद्याची कलमे पुढीलप्रमाणे :– भा. दं.वि कलम ३४१, १८८ सह म. पो. का. कलम ३७ (१) (३)/१३५ पोलीस स्टेशनचे हद्दीत, दास्तान फाटा जासई, ता. उरण, जि. रायगड या ठिकाणी एकत्र येवून सिडको प्रशासनाचा निषेध करून समितीच्या पदाधिकारी यांनी जमलेल्या समुदायास संबोदित करून त्यांच्या मागण्यांसाठी १० ते १५ मिनिटे रस्ता रोको आंदोलन करून सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण केला. तसेच मा. पोलिस आयुक्त सो, नवी मुंबई यांचेकडील १) जा. क्र. कोरोना / मनाई आदेश /१२१३ /२०२२ दि. ४/ ३ / २०२२ रोजीचे फौजदारी प्रक्रीया संहिता सन १९७३ चे कलम १४४ (१) (३) पोलीस आयुक्त यांचे कार्यालय अन्वये २) महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे जा.क्र. पोआ/नमुं/ वि.शा./म. आ/ १३८७/२०२२, दि. १५/०३/२०२२ प्रमाणे निर्गमित आदेशाचे उल्लंघन केले म्हणून गुन्हा |
| ३ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल | SCC. No. 3618/2022 पनवेल शहर पोलीस स्टेशन, पनवेल, जि. रायगड FIR No-CR No. 32/2022 FIR Date - 13/01/2022 | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. याप्रकरणातील लागू कायद्याची कलमे पुढीलप्रमाणे :– भा. दं. वि. सं. कलम १८८, २६९, २७० सह साथरोग अधिनियम १८९७ कलम ३ सह म. कोविड १९ विनियमन २०२० कलम ११ सह अधिनियम महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) १३५ पोलीस स्टेशनचे हद्दीत, दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्व पक्षीय कृती समिती तसेच २१ गाव प्रकल्पवाधित कृती समिती यांच्यावतीने दिवंगत लोकनेते दि. वा. पाटील यांचे जयंतीनिमित्त नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ गाभा क्षेत्र, भराव कोल्ही – कोपर याठिकाणी भुमीपुत्र परिषद कार्यक्रमाचे विनापरवाना आयोजन करून अंदाजे ६०० ते ७०० जनसमुदाय जमवून उपस्थित जनसमुदाय यांनी सामाजिक अंतर राखले नाही, मास्क परिधान न करता कोविड नियमांचे उल्लंघन करून सदर कार्यक्रमाची परवानगी न घेता मा. पोलीस आयुक्त सो, नवी मुंबई यांनी जारी केलेल्या मनाई आदेशाचा भंग केला म्हणून पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या विरोधात सरकारतर्फे फिर्याद आहे. |
| ४ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल | SCC. No. 3204/2022 तळोजा पोलीस स्टेशन, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड FIR No-CR No. 252/2021 FIR Date - 25/08/2021 | न्यायप्रविष्ठ . अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही . भा. दं. वि. सं. कलम १८८, २६९,२७०, सह साथ रोग अधिनियम १९५१ चे कलम ३ सह राष्ट्रीय आपती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ व तसेच महाराष्ट्र पोलीस अधि. १९५१ चे कलम ३७ (१), १३५ पोलीस स्टेशनचे हद्दीत, कोरोना काळामध्ये कोणतीही परवानगी न घेता इतर लोकांसह काम बंद आंदोलन करण्याचा प्रयत्न |
| ५ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, उरण | SCC. No. 145/2023 उरण, पोलीस स्टेशन, ता. उरण, जि. रायगड FIR No - CR No. 245/2021 FIR Date - 09/08/2021 | सदरचा गुन्हा नमुद न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असून आरोपीवर समन्स काढणेवर. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. भा. दं. वि. कलम १८८, २६९, २७० साथीचे रोग कलम ३ पोलीस स्टेशनचे हद्दीत, आरोपींनी विना परवाना मशाल मोर्चाचे आयोजन करून ५ पेक्षा अधिक लोकांना एकत्र करून महाराष्ट्र शासनाने कोरोना १९ संसर्गजन्य रोगाच्या अनुषंगाने लागू केलेल्या नियमांचे उल्लंघन केले. तसेच पोलीस आयुक्त नवी मुंबई यांनी जारी केलेल्या जाक / पोआ/ विशा / मआ / ३५३७ / २०२१ दि. ०२/०८/२०२१ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ (१) (३) १३५ अन्वये तसेच २) जाक्र / कोरोना / मनाई आदेश / ३५३५ / २०२१ दि. ०३/०८/२०२१ अन्वये मनाई आदेशाचे उल्लंघन केले म्हणून गुन्हा |
| ६ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल | SCC. No. 6909/2023 कामोठे पोलीस स्टेशन, ता. पनवेल, जि. रायगड FIR No - CR No. 325/2021 FIR Date - 26/06/2021 | न्यायप्रविष्ठ . अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. भा. दं. वि. सं. कलम १८८, महाराष्ट्र पोलीस अधि. १९५१ चे कलम ३७ (१) (३), १३५ पोलीस स्टेशनचे हद्दीत आरोपीत आंदोलनकर्ते यांनी कोणतीही पूर्व परवानगी न घेता एकत्र जमून हातात सरकारी विरोधी फलक व बॅनर घेवून सरकार विरोधी घोषणा देत भाषणे करून एमजीएम हॉस्पीटल समोर पनवेल सायन रोडवर उतरून रास्ता रोको करून चक्काजाम आंदोलन केल्याने त्यांनी मा. पोलीस आयुक्त सो. नवी मुंबई यांचेकडील जा.क्र. पोआ/नमुं / विशा / म आ / २८१७ / २०२१, दि. १९/०६/२०२१ च्या मनाई आंदेशाचा भंग केला म्हणून गुन्हा |
| ७ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, बेलापूर | SCC. No. 2924/2022 एनआरआय, पोलीस स्टेशन, सीबीडी, बेलापूर FIR No-CR No. 147/2021 FIR Date - 24/06/2021 | न्यायप्रविष्ठ अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. भारतीय दंड संहिता कलम १४३, ३४१, १८८, २६९, २७० साथ रोग अधिनियम १८९७ कलम ३, महाराष्ट्र कोविड १९ विनियन २०२० कलम ११, म .पो. अधि. १९५१ चे कलम ३७ (१) (३), १३५, ११५ /११७ सार्वजनिक मालमत्ता विद्रुपिकरण कलम ३. ध्वनी प्रदुषण नियमन कायदा २००० कलम १५, १९ फिर्यादी यांनी पोलीस आयुक्त सो, नवी मुंबई यांच्याकडील १) जा . क्र . विशा/ नमुं /कामगार / सिडको घेराव/२८५७/२०२१ दि. २२/०६/२०२१ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम १४४ (१) (३) व २) जा. क्र. पोआ / विशा / मआ / २८१७ / २०२१ दि. १९/०६/२०२१ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३ (१) (३) १३५ अन्वये तसेच ३) जा. क्र. कोरोना / मनाई आदेश / २६३६ / २०२१ दि.०६/०६/२०२१ अन्वये मनाई आदेश जारी असून पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात त्याची प्रसिद्धी देखील करूनही लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे आयोजक यांनी अंदाजे १८००० ते २०००० लोकांचा विनापरवाना बेकायदेशीर जमाव जमवून उपस्थित राहुन सार्व जनिक वाहतुकीस अडथळा करून रस्ता अडवून पामबिच रोडवर से . नं. नवीन ५०, सीवुड सिग्नलजवळील असलेल्या रेल्वे ओव्हर ब्रीजच्या जवळ स्टेज तयार केलेले दोन मोठे ट्रेलर आडवे उभे करून त्यावर विनापरवाना लाऊड स्पिकर लावून घोषणा देवून चिथावणीखोर भाषणे केली व प्रमुख नेते व उपस्थित जनसमुदाय यांनी सामाजिक अंतर राखले नाही, मास्क परिधान न करता कोविड नियमांचे उल्लंघन केले तसेच नवी मुंबई महानगरपालिका समोरील किल्ला सिग्नल ते एनआरआय कॉम्प्लेक्स सिग्नल पर्यंतच्या रोडच्या मध्यभागी असलेल्या वीजेचा खांब तसेच झाडावर मोठया प्रमाणावर बॅनर्स व झेंडे लावून सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण केले. तसेच सभास्थळी व परिसरात मोठया प्रमाणात पिण्याच्या पाण्याच्या प्लॅस्टीकच्या रिकाम्या वाटल्या, नाष्टयाचे रिकामे पाकीटे, कागदी पत्रावळया टाकून केरकचरा केला. तसेच सदर आंदोलनाचे विनापरवाना ड्रोनद्वारे शुटींग केले म्हणून वरील कलमान्वये सरकारतर्फे फिर्याद दिल्याने गुन्हा नोंद |
| ८ | मे. मुख्य सत्र न्यायाधिश, रायगड, अलिबाग | SCC. No. 1397/2022 उरण पोलीस स्टेशन, ता. उरण, जि. रायगड FIR No-CR No. 183/2021 FIR Date - 10/06/2021 | सदर खटला नमुद कोर्टामध्ये न्यायप्रविष्ठ आहे. त्यामध्ये दि. ०३/०२/२०२४ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे. भा. दं. वि. कलम १८८, २६९, २७० साथीचे रोग कलम ३ पोलीस स्टेशनचे हद्दीत, आरोपीत यांनी लोकनेते दि. बा. पाटील यांचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास नाव देण्यावावत दि. १०/०६/२०२१ रोजी लोकनेते दि. बा. पाटील सर्वपक्षीय कृती समितीच्यावतीने मानवी साखळी आंदोलन करण्यात आले होते. सदर आंदोलनाची पूर्व तयारी तसेच लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी जासई गाव व उरण परिसरामध्ये मोटार सायकल रॅलीचे आयोजन करून एकत्रित जमून कोरोना रोगाचा संसर्ग व प्रादुर्भावाच्या अनुषंगाने सोशल डिस्टंसिंगचे पालन न करता लोकांची सुरक्षितता धोक्यात आणून व महाराष्ट्र शासनाचे आदेशाचे उल्लंघन केल्याने तसेच कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी शासनाच्या वतीने जारी करण्यात आलेल्या विविध उपाययोजनेचे पालन न केल्याने तसेच मा. पोलीस आयुक्त सो, नवी मुंबई यांनी जाहिर केलेल्या मनाई आदेशाचा भंग केला म्हणून गुन्हा |
| ९ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल | SCC. No. 3990/2021 पनवेल शहर पोलीस स्टेशन, ता. पनवेल, जि. रायगड FIR No-CR No. 309/2021 FIR Date - 10/06/2021 | न्यायप्रविष्ठ. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. भा. दं. वि. सं. कलम १८८, २६९, २७०, सह महाराष्ट्र पोलीस अधि . सन १९५१ चे कलम ३७ (१) (३), १३५ सह साथीरोग अधिनियम १८९७ कलम ३ सह आपत्ती व्यवस्थापन अधि. २००५ चे कलम ५१ पोलीस स्टेशनचे हद्दीत, दि. १०/०६/२०२१ रोजी सकाळी १० ते १२ वा. दरम्यान दि. बा. पाटील सर्वपक्षीय कृती समितीचे पदाधिकारी व त्यांच्या मार्गदर्शनाखाली १८ गाव समितीचे सदस्य असे एकूण सुमारे १५०० कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी पनवेल शहर पोलीस ठाणाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते ठाणा नाका, वडघर ते बंबावीपाडा मेन रोडवर व कोल्ही कोपर येथील दत्त मंदीरासमोर नियोजित विमानतळाच्या जागेवर मोकळ्या मैदानात एकत्र येवून सामाजिक अंतराचे पालन न करता नागरिकांच्या आरोग्याची सुरक्षितता धोक्यात आणून कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी शासनाच्यावतीने जारी करण्यात आलेल्या विविध उपाययोजनांचे पालन न केल्याने तसेच मा. पोलीस आयुक्त सो., नवी मुंबई यांनी जारी केलेल्या मनाई आदेशाचा भंग केला म्हणून गुन्हा |
| १० | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल कोर्टाच्या वेबसाईटवरती या गुन्ह्याची माहिती मिळत नाही. संबंधित न्यायालयाकडून कोणतेही समन्स प्राप्त नाही. खारघर पोलीस स्टेशन यांच्याकडून मिळालेल्या माहितीप्रमाणे मा. न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात कोर्ट केस नं. एम.ए.नं. २८१/२०१३ दाखल आहे. | खारघर पोलीस स्टेशन, ता. पनवेल, जि. रायगड FIR No-CR No. 72/2010 FIR Date - 27/09/2010 | न्यायप्रविष्ठ. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. भा. दं. वि. सं. कलम १८८, सह महाराष्ट्र पोलीस अधि. सन १९५१ चे कलम ३७ (१) (३), १३५ पोलीस स्टेशनचे हद्दीत, यातील अटक आरोपी यांनी व पळून गेलेल्या आरोपी यांनी वेकायदेशीर जमाव जमवून शाळेची फी वाढी संदर्भात आंदोलन करून मा. पोलीस आयुक्त कायदा कलम ३७ (१,३), १३५ या मनाई आदेशाचा तसेच पोलीसांनी दिलेल्या लेखी आदेशाचा भंग केला म्हणून गुन्हा. |

| (ब) फौजदारी अपराधांसाठी दोषसिद्ध ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील | | | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| अ.क्र. | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशांचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

* राज्यसभेच्या निवडणुकीच्या किंवा विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत विधानसभा सदस्यांनी मतदारसंघाच्या नावाच्या जागी संबंधित निवडणुकीचे नाव नमुद करावे.

**टिप : –**

१. उमेदवारांविरूद्धच्या प्रलंवित असलेल्या फौजदारी खटल्यांबाबतचा तपशील ठळक अक्षरात असावा.
२. वृत्तपत्रांमधील मजूकर किमान १२ या टंक (फॉंट) आकारात प्रसिद्ध केला जाईल.
३. प्रत्येक प्रकरणासाठी स्वतंत्र ओळींमध्ये स्वतंत्रपणे तपशील देण्यात यावा.
४. जर उमेदवार विशिष्ट पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवत असेल तर त्याने / तिने पक्षाला त्याच्या / तिच्या विरूद्ध प्रलंबित असलेल्या फौजदारी खटल्यांबाबत कळवणे आवश्यक आहे.
५ . उमेदवार अशा प्रसिद्धीनंतर तात्काळ फौजदारी खटल्यांबाबत प्रतिज्ञापत्राच्या प्रसिद्धतीबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळवेल. याशिवाय, तो निवडणूकीचा निकाल घोषीत झाल्यापासून ३० दिवसांच्या आत निवडणूक खर्चाच्या हिशेबासह प्रपत्र सी–४ मध्ये प्रकरणांच्याबाबतीत प्रतिज्ञापत्राच्या प्रसिद्धीबाबतचा अहवाल सादर करील.
(अ) लोकसभा व विधानसभा निवडणुकींच्याबाबतीत, हे संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर केले जाईल.
(ब) राज्यसभा व राज्य विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत, हे संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर केले जाईल. हे उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिनांकाच्या दुसऱ्या दिवसापासून आणि मतदानाच्या दिनांकापूर्वी दोन दिवस अगोदरपर्यंत वृत्तपत्र व दूरदर्शनवर प्रसिद्ध केले जाऊ शकते.

# राज्यात महायुतीचे सरक़ार पुन्हा सत्तेत हवे -आमदार प्रशांत ठाकूर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्य जनतेचा विचार करणारे महायुतीचे सरकारच राज्यात पुन्हा सत्तेत यायला पाहिजे, असे प्रतिपादन भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर पाटीदार समाजाच्या बैठकीत बुधवारी (दि.१३) केले.

या बैठकीत खारघरमधील कच्छ कडवा पाटी पाटीदार समाज, कच्छ वागड लेवा पाटीदार समाज आणि सौराष्ट्र लेवा पटेल समाजाने आपला जाहिर पाठिंबा आमदार प्रशांत ठाकूरांना जाहिर केला.

पनवेल मतदार संघाचा विकासासाठी सदैव तत्पर असलेले आमदार प्रशांत ठाकूर यांना विधानसभा निवडणुकीसाठी विविध संस्था, संघटना तसेच समाजाच्या वतीने पाठिंबा जाहिर करण्यात येत आहे. त्यानुसार खारघरमध्ये झालेल्या पाटीदार समाजाची बैठक झाली. यात आमदार प्रशांत ठाकूर यांना खारघर कच्छ कडवा पाटीदार समाज, कच्छ वागड लेवा पाटीदार समाज, आणि सौराष्ट्र लेवा पटेल समाजाने आपला जाहिर पाठिंबा दिला.

या बैठकीला भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, कच्छ कडवा पाटीदार समाजाचे अध्यक्ष कांतीभाई पटेल, कच्छ कडवा पाटीदार युवक मंडळाचे अध्यक्ष राजेश छाभैया, कच्छ वागड लेवा पाटीदार समाजाचे अध्यक्ष जीवाभाई रावत, पाटीदार समाजाचे उपाध्यक्ष जीतुभाई पटेल, सौराष्ट्र लेवा पटेल समाजाचे रमेश सोरठीया, कुनालभाई संघाणी, भानजीभाई पटेल, भाजप सोशल मिडीया सेलच्या सहसंयोजीका बीना गोगरी, युवमोर्चाचे उपाध्यक्ष प्रवीण वेरा यांच्यासह पाटीदार समाजाचे बांधव उपस्थित होते.

# खारघरमध्ये महायुतीची प्रचार रॅली





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अडीच वर्षाच्या काळात महाविकास आघाडीचे सरकारने फक्त विकासाच्या प्रकल्पांना स्थगिती देण्याशिवाय दुसरे कोणतेही काम केले नाही, मात्र महायुतीच्या सरकारने विविध जनकल्याणकारी योजना राबवून जनतेला दिलासा दिला त्यांना विकासाच्या दिशेने नेले त्यामुळे राज्य हितासाठी आणि महाराष्ट्राच्या भवितव्यासाठी भाजपा महायुतीला मतदान करा, असे आवाहन भाजप महायुतीचे पनवेल मतदार संघाचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि.१३) खारघरमध्ये प्रचार रॅलीवेळी केले.

जस जशी विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची तारीख जवळ येत आहे तस तशी पनवेल मतदार संघात आमदार प्रशांत ठाकूरांचा प्रचाराला वेग आला आहे. महायुतीचे पदाधीकारी प्रत्येक मतदारांपर्यंत पोहचून आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या विकास कामांची माहिती देत त्यांना येत्या निवडणुकीत कमळासमोरील बटन दाबून भरघोष मताधिक्याने विजयी करण्याचे आवहन करत आहेत. त्याअंतर्गत खारघर आणि तळोजामध्ये भव्य प्रचार रॅली बुधवारी काढण्यात आली.

या रॅलीला जनतेचा प्रचंड प्रतिसाद लाभला तसेच युवा तरुणांनीदेखील मोठ्या संख्येने बाईक रॅलीत सहभागी होत आमदार प्रशांत ठाकूर यांचा जयघोष करून विजयी करण्याचे आवाहन केले. या रॅलीत भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक हरेश केणी, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, भाजपचे पनवले शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, वासुदेव घरत, प्रभाकर जोशी, निर्दोश केणी, महिला मोर्चाच्या खारघर शहर अध्यक्षा साधना पवार, उमेश चौधरी, विनोद घरत, सचिन वास्कर, जयदास तेलवणे, प्रल्हाद गायकर, जागदीश घरत, साजीद पटेल, मस्नूर पटेल, जिशाद पटेल, संतोष पाटील, संतोष भोईर, जया घरत, संतोष घरत, रवी घरत, हरिश्चंद्र जोशी, प्रविण घरत, प्रल्हाद गायकर, रोहित पाटील, जगदीश घरत, विशाल घरत, अनिरुद्ध जोशी, विशाल जोशी, संदीप वास्कर, रणजीत घरत, गणेश जोशी, दीलीप कडू, तेजस पाटील, मानीक म्हात्रे, प्रभाकर खांदेकर, विवेक जोशी, मच्छींद्र कोळी, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक भोपी, शुभ पाटील यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# दिघाटीत आमदार महेश बालदी यांच्या प्रचारार्थ रॅली



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिघाटी येथील महायुतीच्या प्रचार रॅलीला मतदारांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. या वेळी कार्यकर्त्यांनी आमदार महेश बालदी यांनी केलेल्या विकासकामांची कार्य अहवाल पुस्तिका घराघरात मतदारांपर्यंत पोहचविण्याचे काम केले.

जात-पात-धर्म-पंत न मानता नेहमीच विकासाचे राजकारण करणारे आणि उरणचा सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध असलेले आमदार महेश बालदी हे पुन्हा उरण मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. त्यांनी या मतदारसंघात ५०० कोटींची विकासकामे करेन, असे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात त्यांनी या मतदारसंघात साडेपाच हजार कोटींहून अधिक रकमेची विकासकामे केली आहेत. या विकासकामांच्या जोरावर ते पुन्हा आमदार होतील, असा ठाम विश्वास मतदारांना आहे.

प्रचार रॅलीवेळी दिघाटी ग्रामपंचायतीच्या सरपंच रजनी ठाकूर, माजी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य अमित पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य स्मिता ठाकूर, ज्येष्ठ नेते रामदास ठाकूर, शाळा कमिटी अध्यक्ष विकास पाटील, भाजप नेते चांगाजीशेठ पाटील, भाजप केळवणे पं.स. विभागीय अध्यक्ष हिरामण ठाकूर, रामभाऊ पाटील, अशोक पाटील, राजाराम पाटील, युवा मोर्चा केळवणे पं.स. माजी उपाध्यक्ष सुबोध ठाकूर, राजेश ठाकूर, संतोष पाटील, सचिन पाटील, प्रकाश पाटील, राहुल पाटील, नरेंद्र पाटील, प्रितम पाटील आदींसह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# उरणमध्ये ट्रेलरच्या धडकेने एकाचा मृत्यू

**उरण : रामप्रहर वृत्त**

ट्रेलरच्या धडकेत दुचाकीस्वाराच्या मृत्यूची घटना उरण फाटा मार्गावर घडली आहे. याप्रकरणी सीबीडी पोलीस ठाण्यात ट्रेलरचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उरण फाटा मार्गावर सीबीडी पोलीस ठाणे हद्दीत रेल्वे पुलालगत हा अपघात घडला.

शेख जुनेद रियाजुद्दीन है मोटरसायकलवरून मार्गाने जात असताना पाठीमागून आलेल्या ट्रेलरने त्यांना धडक दिली. यामध्ये ते खाली कोसळले असता गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी सीबीडी पोलीस ठाण्यात ट्रेलरचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.



**उरण : कृषी क्षेत्रात उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी करणारे आदर्श शेतकरी प्रकाश शांताराम ठाकूर यांना महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाकडून वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्याबद्दल त्यांनी ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री महाराष्ट्रभूषण डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांचे आशीर्वाद घेतले. सोबत राष्ट्रवादीचे उरण तालुकाध्यक्ष परिक्षीत ठाकूर.**

# कामोठ्याच्या लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये बाल दिन



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये गुरुवारी (दि.१४) स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या १३१व्या जयंतीनिमित्त बाल दिन हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्था रायगड विभाग उपविभागीय अधिकारी विलासराव जगताप, प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, 'रयत'चे पीआरओ बाळासाहेब कारंडे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाली. त्यानंतर सर्व पाहुण्यांचे स्वागत शाळेचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी यांनी भेटकार्ड देऊन केले.

या वेळी प्रमुख पाहुणे विलासराव जगताप यांनी त्यांच्या प्रेरणादायी भाषणातून मुलांना भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनी बाल दिन साजरा करण्यामागचा उद्देश सांगितला, व त्यांनी सांगितल्या प्रमाणे आपल्याला पुढील जीवनासाठी प्रेरणादायी तत्व जे पंडित जवाहरलाल नेहरूंनी पाळले होते त्याचे महत्त्वही पटवून दिले. बाल दिनानिमित्त शाळेतील सर्व शिक्षकवृंद यांनी मुलांसाठी विविध नाविन्यपूर्ण खेळाचे आयोजन केले होते. यात मुख्यतः सर्व खेळ सृजनशीलतेला वाव देणारे होते.

या वेळी शाळेचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी यांनी मुलांना नैतिक मूल्य व त्याचे संगोपन करून राष्ट्र निर्माण कसे करता येईल त्याबद्दल मार्गदर्शन केले व त्यांना बाल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे पर्यवेक्षिका अर्चना मातुर व रुहाल दुबे तसेच सर्व शिक्षकवृंद मुख्यतः ग्रीन हाऊस यांनी केलेल्या उत्कृष्ट आयोजनाचे प्राचार्यांने कौतुक केले. कार्यक्रमाची सांगता कॉर्डिनेटर रुहल दुबे यांनी आभार प्रदर्शनाने केली.




**पनवेल : आमदार महेश बालदी यांच्या प्रचारार्थ साई येथे रॅली काढण्यात आली. या वेळी साईचे माजी सरपंच अण्णाशेठ पाटील, विद्याधर मोकल, उपसरपंच हिरामण मोकल आदींसह भाजप, शिवसेना, राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# मतदान जागरूकतेसाठी कळंबोलीमध्ये बाईक रॅली



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणूकीत पनवेल मतदारसंघात जास्तीत जास्त मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावावा, मतदानाची टक्केवारी वाढवी याकरिता जनजागृती करण्यात येत आहे. गुरुवारी (दि.१४) महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानूसार प्रभाग समिती ब कळंबोली येथे बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या वेळी प्रभारी अधिक्षक अरविंद पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे , स्वच्छता निरीक्षक, सफाई कर्मचारी, प्रभाग कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. या बाईक रॅलीमध्ये १०० हून अधिक महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या रॅलीत सहभाग घेतला.

कळंबोलीमधील सुधागड हायस्कूलपासून या बाईक रॅलीची सुरूवात झाली. पुढे जनता मार्केट, अग्निशमन ऑफीस, पोस्ट ऑफीसमार्गे प्रभाग कार्यालय कळंबोलीजवळ या बाईक रॅलीची सांगता झाली. या रॅली अंतर्गत मतदान है सबकी जिम्मेदारी, छोडो आपने सारे काम पहले चलो करे मतदान, आपल्या मताचे दान आहे, लोकशाहीची शान अशा घोषणा देत बॅनर्सच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली तसेच उपस्थितांना मतदान करण्याची शपथ देण्यात आली. याबरोबरच मतदान जनजागृति कार्यक्रम अंतर्गतआज महापालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पालकांना देण्यासाठी संकल्प पत्राचे वाटप करण्यात आले.

येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभेची निवडणुक होणार असून या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांची (सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्रॅम) अमंलबजावणी १८८ पनवेल विधानसभा मतदार संघामध्ये अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात केली जात आहे. स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यासाठी स्वीप पथक प्रमुख शहरअभियंता संजय कटेकर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महापालिका हद्दीतील महाविद्यालयामध्ये तसेच शाळांमध्ये विविध कार्यक्रम स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे तसेच महापालिकेच्यावतीने स्वीप कार्यक्रमांतर्गत प्रभात फेरी, बाईक रॅली, फ्लॅश मॉब, वासुदेव, मास्कॉट्स, सेल्फी पाँईटस, आईसी व्हॅन, ट्रायसायकलच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणच्या डिजीटल बॅनरवरतीदेखील जनजागृतीच्या जाहिरतीचे प्रसारण केले जात आहे.

बचत गटाच्या महिलांची बैठक, रॅली, आशा सेविकांच्या माध्यमातून मतदान कमी असणाऱ्या भागात पत्रकाचे वाटप करण्यात येत आहे.

# आमदार महेश बालदींचा उरण शहरात जोरदार प्रचार



**उरण : वार्ताहर**

उरण विधान मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार महेश बालदी यांचा सर्वत्र प्रचार सुरू आहे. त्याअनुषंगाने बुधवारी (दि.१३) उरण शहरात सायंकाळी प्रचार रॅली काढण्यात आली होती.

आमदार महेश बालदी संपर्क कार्यालय उरण येथून प्रचाराला सुरुवात झाली. संपूर्ण शहरात येऊन येणार कोण आमदार महेश बालदींशिवाय आहे कोण, अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

या प्रचारात भाजप उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, माजी उपनगराध्यक्ष जयवीन कोळी, भाजप शहर अध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शाह, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, माजी नगरसेवक प्रियांका पाटील, निता बालदी, नेहा बालदी, राधिका बालदी, हितेश शाह, तनुज बालदी, निलेश पाटील, विशाल पाटेकर, रोहित पाटील, जगदीश पाटील, हस्तीमल मेहता, गिरीश परीहारीया, संतोष ओटावकर, समीर म्हात्रे, हेमंत बोंबले, कुणाल शिसोदिया, उषा शिसोदिया, विदुला कुलकर्णी, प्रतीक्षा पेडणेकर, सुरभी बालदी, ममता समेळ, वंदना पाटील, बद्रेश रावळ, मकरंद पोतदार, संतोष साळवी, अभिषेख जैन, दिनेश पाटील, धार्मिक पटेल, महेश माळी, कैलास भोईर, मदन कोळी, राजेश कोळी, मनोहर सहतीया, अजित भिंडे, मनन पटेल, निलेश पाटील, सुरज ठवले, सुनील पेडणेकर, परेश तेरडे, सागर मोहिते, सविन म्हात्रे, सतीश मर्चडे आदी प्रचार रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

# वशेणी येथे रविवारी स्त्रियांसाठी आरोग्य शिबिर

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

वशेणी येथील रवी किरण हॉस्पिटल, उरण मॅग्नस हॉस्पिटल उलवे आणि इतिहास संपादकीय मंडळ वशेणी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २४) वशेणी दादर कडापे रोड, पोलीस चौकीजवळ असलेल्या रवी किरण हॉस्पिटल येथे सकाळी १० वाजता मोफत स्त्रीरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात स्त्री रोग तज्ज्ञांकडून मोफत पीएपी, एसएमइएआर तपासणी तसेच गर्भाशय आरोग्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी रविकिरण हॉस्पिटल (९८२१२६६६७०), मच्छिंद्र म्हात्रे (९८१९६५२९५१), संतोष पाटील (९९२०७२४४५७), बी.जे. म्हात्रे (९७६९२७५००३), गणेश खोत (८०९७३५८७८८), ए.बी. तांडेल (९९२०३४५०३६) संदेश गावंड (९६५७८६५८८४) यांच्याशी संपर्क साधा, असे आवाहन मच्छिंद्र म्हात्रे यांनी केले आहे.

# पनवेलमध्ये पं. नेहरूंना अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या मुख्यालयात गुरुवारी (दि.१४) भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी आयुक्त मंगेश चितळे, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती बालदिन म्हणून साजरी केली जाते. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिकेच्या सर्व ११ शाळांमध्ये पंडित जवाहरलाल नेहरू जयंतीनिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# मालमत्ता करवाढ प्रस्तावामुळे खालापूरचे नागरिक आक्रमक

## बैठकीत अधिकाऱ्यांना विचारला जाब



**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपंचायत हद्दीत महिलांच्या डोक्यावरील अद्याप हंडा उतरलेला नसताना मालमत्ता करात वाढीसाठी नोटीसा पाठवण्यात आल्याने संतप्त नागरिकांनी खालापूर नगरपंचायत कार्यालयात याबाबत जाब विचारला, परंतु समाधानकारक उत्तर न मिळाल्याने नागरिक आणखीनच आक्रमक झाले आहेत. याबाबत बुधवारी (दि.१३) नगरपंचायत कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

मालमत्ता वार्षिक पुर्नमुल्यांकन प्रस्तावित असून दर पुढील पाच वर्षांत करिता अनुक्रमे ४०, ६०, ८० आणि १०० टक्के याप्रमाणे लागू करण्यात येण्याबाबत नगरपंचायत खालापूर हद्दीत नागरिकांना नोटीस पाठवण्यात आल्या आहेत, परंतु आजही शुद्ध पाण्यासाठी जार विकत घ्यावे लागत आहेत. नगरपंचायत स्थापन झाल्यापासून नागरिकांना मूलभूत सोयीसुविधासुद्धा मिळाल्या नसताना मालमत्ता करवाढ नागरिकांच्या माथी मारली जात आहे. याबाबत बुधवारी खालापूर शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नवीनचंद्र घाटवळ, दिपक बोंदार्डे, नयन मानकामे, विजय भोसले, वैभव भोईर, अभिषेक खडकबाण, उमेश पडवकर, विजय सावंत, सनिल घाटवळ, रोशन खराळ, नितीन पाटील, सचिन कळमकर यांच्यासह खालापूरकर नागरिकांनी नगरपंचायत कार्यालय गाठत जाब विचारला.

> मालमत्ता करवाढीला मी विरोध दर्शवला होता. ही वाढ अन्यायकारक असल्याचे माझे आजही मत असून मी नागरिकांच्या बाजूने ठाम आहे.
> **–राजेश पारठे, नगरसेवक, खालापूर**

> नगररचना आणि मूल्य निर्धारण विभागाच्या आदेशानुसार संबंधित मालमत्ता करवाढीचा प्रस्ताव मांडण्यात आला. उशिरा नोटीस मिळाली असल्यास त्याबाबत मुदत वाढवून देण्याबाबत विचार सुरू आहे.
> **–देवेंद्र मोरखंडीकर, अधिकारी, नगरपंचायत खालापूर**

अन्यायकारक मालमत्ता करवाढ कोणत्या निकषांवर केली यावर उत्तर देताना अधिकाऱ्यांनी नगरपंचायतीमधील विद्यमान लोकप्रतिनिधींसमवेत बैठकीनंतर नोटीस काढण्यात आल्याचे उत्तर देत वेळ मारून नेल्याने संताप व्यक्त होत आहे. नागरिकांना गृहीत न धरणाऱ्या लोकप्रतिनिधींना जशास तसे उत्तर देण्यासाठी नागरिकांनी निवडणुकीत मतपेटीतून उत्तर देण्याचे ठरवले आहे.

## पेणच्या विकासासाठी पुन्हा रविशेठ पाटील यांना निवडून द्या –किशोर म्हात्रे



**नागोठणे : प्रतिनिधी**

पेण-सुधागड, रोहा विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी जनतेने महायुतीचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांना निवडून देणे गरजेचे आहे. महायुतीचे सर्व कार्यकर्ते प्रचंड मेहनत घेत आहेत. पेण विधानसभा मतदारसंघाचा न भूतो ना भविष्यती असा विकासासाठी पुन्हा एकदा रविशेठ पाटील यांना निवडून द्या, असे आवाहन भाजप नेते किशोर म्हात्रे यांनी वरवठणेत गावबैठकीत केले.

ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी नमो किसान योजना राबवून प्रतिवर्षी १२००० रुपये देऊन शेतकऱ्यांचा सन्मान केला. महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम उभे आहे. महाराष्ट्र सरकारने गावोगावी रस्ते, हर घर नल योजना अशा अनेक योजना राबविल्या आहेत. आमदार रविशेठ पाटील मंत्री असताना त्यांनी जनतेची अनेक कामे मार्गी लावली आहेत. त्यांनी केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून पेण विधानसभा मतदारसंघात अनेक योजना यशस्वीरित्या राबविल्या. आमदार रविशेठ पाटील यांच्या घरी मदत मागण्यासाठी गेलेली कुणीही व्यक्ती कधीच रिकाम्या हाताने आलेला नाही. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित असल्याचा विश्वासही किशोर म्हात्रे यांनी व्यक्त केला.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बुधवारी (दि.१३) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण १६७ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एक लाख ७० हजार ३०० रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे बेदरकार वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

## परसबाग स्पर्धेत निंबारवाडी शाळेचे यश

**चौक** : अतिदुर्गम निंबारवाडी शाळेने प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत उत्कृष्ठ परसबाग म्हणून द्वितीय क्रमांक पटकावला आहे. शाळाप्रमुख संदीप काईनकर, उपशिक्षक काळू गायकर, गटशिक्षण अधिकारी कैलास चोरमळे, पोषण आहार अधीक्षक दिपा परब, वरीष्ठ विस्तार अधिकारी दास, बीट विस्तार अधिकारी पाडवी, केंद्रप्रमुख गोविंद दरवडा, किशोर परदेशी, समूह साधन नंदकुमार घरत व ग्रामस्थांनी सहाकार्य केले.

# माथेरान वनपरिक्षेत्रात बिबट्याचा वावर नाही!

### व्हायरल व्हिडीओ फेक; वनविभागाचा दावा

**माथेरान : प्रतिनिधी**



कटच्यावरचा गणपती परिसरात बिबट्याचे दर्शन झाल्याचा व्हिडीओ आणि फोटो समाजमाध्यमांवर व्हायरल झाले आहेत, मात्र समाजमाध्यमांवर व्हायरल व्हिडीओ फेक असल्याचा दावा वनविभागाने केला आहे. तरीदेखील सर्वांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन वनविभागाने केले आहे.

व्हायरल फोटो आणि व्हिडीओची खात्री माथेरान, नेरळ वनविभागाने केली असून असा कोणताही प्रकार माथेरान वनक्षेत्रात घडलेला नाही, तसेच प्रत्यक्ष व्हिडीओमध्ये दाखवलेल्या ठिकाणी वनविभागाचे वनक्षेत्रपाल उमेश जंगम, वनपाल एस.एम. म्हात्रे,राजवर्धन आडे आणि वन कर्मचाऱ्यांनी भेट दिली. त्या भेटीमध्ये त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे ठसे आढळून आलेले नाहीत, तसेच परिसरात जमीन अजूनही ओली असून त्या जमिनीवरदेखील कुठेही ठसे आढळून आलेले नाहीत. महत्त्वाचे म्हणजे नुकतेच पाऊस गेला असून बिबट्याच्या वाटेवर कुठेही गवत विस्कटलेले आढळून आलेले नाही. त्यामुळे सदरचा व्हिडीओ आणि फोटो हे फेक असल्याचा निष्कर्ष वनविभागाने काढला आहे. माथेरान परिसरात बिबट्या असल्याचे पुरावे मागीलवर्षी आढळले होते.

**मे.पवार मॅडम कोर्ट**
SHRI KARAN KHARAT
Advocate for Applicant
**ने ता.** 05/12/24
**नि ७/ड**

**PUBLIC NOTICE**

In the court of the Civil Judge S.D. Panvel
At Panvel'
M. A. No. 1370 of 2024

Smt.Kashmira Yatin Vaghani
Indian, aged about 65 years,
R/at: Flat no.54,11th floor, sheela apt.
Bhulabhai Desai Road,
Nr. Mahalaxmi Temple Mahalaxmi,
Mumbai-400026 Applicant
V/s
Nil Opponent

Whereas the applicant above named has filed an application before this court for grant of the Heirship Certificate in respect of the immoveable. property, as described in the schedule hereunder, left by the deceased **Shri Jagdish Mulshankar Dalal,** who expired **on 01.03.1994 at Sion Hospital, Mumbai.**

And whereas if any person has any right, title, interest, or share etc. of any nature whatsoever in the scheduled property, is/are hereby invited to submit his/her/their objection in this court within the period of **30 days from the date of the publication of this public** notice.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

All that piece and parcel of **1/5th share,** area **admeasuring 1880 sq. mtrs.**, standing in the name of the deceased **Shri Jagdish Mulshankar Dalal**,in the Agricultural landed property known as Gut No.9/3/B (Khate No.375), situated at: Mouje-Narlachi Wadi (943184), Tal. Karjat, Dist. Raigad.

AS SUCH if nothing is received within the stipulated period of 30 days from the date of the publication of this public notice, the application of the applicant shall be preceded further and the appropriate orders may be passed.

Given under my hand and seal of this court on this day

court stamp

**sd/-**
**Superintendent**
**Civil Court S.D. Panvel**

**जोडपत्र ४७**
**प्रपत्र क – १**

सदर प्रपत्र, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिनांकाच्या दुस–या दिवसापासून आणि मतदानाच्या तारखेच्या दोन दिवस आधीपर्यंत वृत्तपत्रामध्ये आणि दूरदर्शनवर प्रसिध्द करता येईल.

(उमेदवाराने वृत्तपत्रे, दूरदर्शन यामध्ये प्रसिध्द करण्यासाठी)

**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाऊंडेशन आणि इतर विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या निकालानुसार.

**उमेदवाराचे नाव व पत्ता** : **श्री. महेश रतनलाल बालदी**
घर नं. ६०४ ब, राधाकुंज बंगला, नागांव रोड,
ता. उरण, जि. रायगड, महाराष्ट्र ४००७०२.

**राजकीय पक्षाचे नाव** : भारतीय जनता पार्टी
(अपक्ष उमेदवारांनी येथे ''अपक्ष'' असे लिहावे )

**निवडणूकीचे नाव** : महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

**मतदारसंघाचे नाव** : १९० उरण विधानसभा मतदारसंघ

मी, **श्री. महेश रतनलाल बालदी** (उमेदवाराचे नाव) वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चरित्राबदद्लचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे.

**(अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे**

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती | संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे ) थोडक्यात वर्णन |
|---|---|---|---|---|
| १ | JMFC उरण | SCC १४५/२०२३ गुन्हा रजि. नं. २४५/२०२१ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. १८८, २६९, २७० कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे. |
| २ | सत्र न्यायालय अलिबाग | खाजगी खटला सेशन केस–४०/२०२३ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. ३५३ सरकारी कामात अडथळा निर्माण करणे. |
| ३ | JMFC उरण | SCC ३८/२०२३ गुन्हा रजि. नं. ५५/२०२२ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. ३४१,१८८, महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७ (१) (३), १३५ सरकारी नियमांचे पालन न करणे. |
| ४ | JMFC उरण | SCC ३५/२०२३ गुन्हा रजि. नं. १८४/२०२१ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. १८८, २६९, २७०, साथीचे रोग अधिनियम कलम – ३ कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे. |
| ५ | JMFC पनवेल | SCC ३६१८/२०२२ गुन्हा रजि. नं. ३२/२०२२ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. १८८, २६९, २७०, महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७(१) (३), १३५ कोविड कालवधीत नियमांचे उल्लंघन करणे व लोक जमा करणे. |
| ६ | JMFC पनवेल बेलापूर,जि.ठाणे. | SCC २९२४/२०२२ गुन्हा रजि. नं. १४७/२०२१ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. १४३, ३४१, १८८, २६९, २७०, साथीचे रोग अधिनियम कलम ३ महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७(१) (३),१३५, ११५, ११७ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम कलम ३, ध्वनीप्रदुषण नियमन कलम १५ व १९ कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे व लोक जमा करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे व ध्वनीप्रदुषण करणे. |
| ७ | CJM अलिबाग | SCC १३९७/२०२२ गुन्हा रजि. नं. १८३/२०२२ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. ०३/०२/२४ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे. | भा.दं.वि. १८८, २६९, २७०, EC ॲक्ट कलम–३ कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे. |
| ८ | CJM अलिबाग | SCC १३९६/२०२२ गुन्हा रजि. नं. २४८/२०२१ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. ०३/०२/२४ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याचीं संपरिक्षा सुरू आहे. | भा.दं.वि. १८८, २६९, २७० पोलिस अधिनियम ३७ (१) (क), १३५ कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे व लोक जमा करणे. |
| ९ | CJM अलिबाग | RCC ८३/२०२० | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. ११/०१/२४ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे. | पर्यावरण संरक्षण कायदा कलम –१५ ध्वनीप्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम कलम – १९ गणेशोत्सव मिरवणुकी दरम्यान स्पिकर लावुन ध्वनीप्रदुषण करणे. |
| १० | CJM अलिबाग | RCC ८२/२०२० गुन्हा रजि. नं. २४/२०१० | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. २८/०८/१३ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे. | भा.दं.वि. ३२५, ३२४, ३२३, ५०४, ५०६(२), ३४ मारहाण करणे व शिवीगाळ करणे. |
| ११ | CJM अलिबाग | खाजगी खटला RCC ८१/२०२० | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. ०७/०६/२२ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे. | भा.दं.वि. ३२४, ३२३, ५०४, ५०६(२),५०९, ३४, १४७, १४८ मारहाण करणे व शिवीगाळ करणे. गैरकायद्याची मंडळी जमविणे, महिलेस लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणे. |

**(ड) फौजदारी अपराधांसाठी दोषसिद्ध ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील**

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशांचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | ठोठावलेली सर्वाधिक शिक्षा |
|---|---|---|---|
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

* राज्यसभेच्या निवडणुकीच्या किंवा विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत विधानसभा सदस्यांनी मतदारसंघाच्या नावाच्या जागी संबंधित निवडणुकीचे नाव नमुद करावे.

**टिप : –**

१. उमेदवारांविरूध्दच्या प्रलंबित असलेल्या फौजदारी खटल्यांबाबतचा तपशील ठळक अक्षरात असावा.
२. वृत्तपत्रांमधील मजकूर किमान १२ या टंक (फॉंट) आकारात असावा.
३. प्रत्येक प्रकरणासाठी स्वतंत्र तपशील द्यावा.
४. एखादा उमेदवार एखादया विशिष्ट पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढत असेल तर, त्याने/तिने पक्षाला त्याच्या/तिच्या विरूध्द प्रलंबित असलेल्या फौजदारी खटल्यांबदद्ल माहिती देणे आवश्यक आहे.
५. उमेदवाराने प्रसिध्दी नंतर लगेच फौजदारी खटल्यांबाबत घोषणापत्र प्रसिध्द करण्याबाबत निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास अहवाल द्यावा. याशिवाय, तो, निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत निवडणूक खर्चाच्या हिशेबासह प्रपत्र क्र. ४ मधील प्रकरणांबाबत घोषणापत्र प्रकाशित करण्याबाबतचा अहवाल सादर करील. (क) लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांच्या बाबतीत, हा अहवाल संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल. (ख) राज्यसभा आणि राज्य विधानपरिषदेच्या निवडणुकांच्या बाबतीत, हा अहवाल संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल.



















खारघर : भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्रपक्षाचे उमेदवार मंत्री रवींद्र चव्हाण (डोंबिवली), आमदार संजय केळकर (ठाणे शहर), आमदार प्रशांत ठाकूर (पनवेल), आमदार गणेश नाईक (ऐरोली), आमदार महेश बालदी (उरण), आमदार मंदा म्हात्रे (बेलापूर), आमदार रविशेठ पाटील (पेण), आमदार महेंद्र थोरवे (कर्जत) यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भव्य विजय संकल्प सभा झाली.

# रोमहर्षक सामन्यात भारताची सरशी

## द. आफ्रिकेवर तिसऱ्या टी-२०मध्ये मात; तिलक वर्माचे तडाखेबंद शतक

**सेंच्युरियन : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने रोमहर्षक सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ११ धावांनी पराभव करत चार सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. तिलक वर्माच्या शतकाच्या जोरावर भारताने २० षटकांत ६ बाद २१९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेच्या संघाला निर्धारित षटकांत सात विकेट्सच्या मोबदल्यात २०८ धावांपर्यंत मारता आली. त्यामुळे त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले.

दक्षिण आफ्रिकेकडून मार्को यान्सेनने झुंजार खेळी साकारली. तो जोपर्यंत खेळपट्टीवर होता, तोपर्यंत भारत जिंकेल याची शाश्वती नव्हती, मात्र तो मोक्याच्या क्षणी बाद झाल्याने भारताने विजयावर शिक्कामोर्तब केले. तत्पूर्वी त्याने १७ चेंडूंत चार चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने ५४ धावांचे योगदान दिले.

मार्को यान्सेनने अवघ्या १६ चेंडूत अर्धशतक झळकावले, जे त्याच्या टी-२० कारकिर्दीतील पहिले अर्धशतक आहे. यान्सेनने संघाला विजयापर्यंत नेण्याचा पुरेपूर प्रयत्न केला, मात्र अर्शदीपने त्याला अखेरच्या षटकात बाद करत दक्षिण आफ्रिकेची शेवटची आशा संपुष्टात आणली. दक्षिण आफ्रिकेसाठी हेनरिक क्लासेनने २२ चेंडूत एक



चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ४१ धावा केल्या. क्लासेनलाही अर्शदीपने बाद केले. भारताकडून अर्शदीपने तीन, वरुण चक्रवर्तीने दोन आणि हार्दिक पांड्या आणि अक्षर पटेलला प्रत्येकी एक विकेट मिळाली.

तत्पूर्वी, तिलक वर्माचे शतक आणि अभिषेक शर्माच्या अर्धशतकाच्या जोरावर भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेसमोर तिसऱ्या टी-२० सामन्यात २२० धावांचे लक्ष्य ठेवले होते. भारतासाठी तिलने टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले, ज्यामुळे भारतीय संघ २०० धावांचा टप्पा पार करण्यात यशस्वी ठरला. त्याने ५६ चेंडूंत आठ चौकार आणि सात षटकारांसह १०७ धावांची खेळी साकारली. अभिषेकने २५ चेंडूंत ५० धावा केल्या, ज्यात तीन चौकार व पाच षटकारांचा समावेश होता.




# आशिया चषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा

## पंत-हार्दिकचा समावेश; मोहम्मद अमान करणार नेतृत्व

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) कनिष्ठ निवड समितीने आगामी आयसीसी पुरुष अंडर १९ आशिया चषक स्पर्धेसाठी भारताच्या १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. ही स्पर्धा संयुक्त अरब अमिराती येथे पार पडणार असून मोहम्मद अमान १९ वर्षाखालील भारतीय संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे.

१९ वर्षाखालील भारतीय संघाचा या स्पर्धेत दबदबा राहिला आहे. आठ वेळा भारतीय संघाने ही स्पर्धा जिंकली असून आता पुन्हा नव्या नवव्यांदा ही ट्रॉफी पटवण्यासाठी तगडी संघ बांधणी करण्यात आलीये. अमानच्या नेतृत्वाखालील संघात पंत आणि हार्दिक यांना संधी देण्यात आली आहे.

या संघात १३ वर्षीय वैभव सूर्यवंशीचाही समावेश आहे. वर्षाच्या सुरुवातीला त्याने चेन्नईत ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या युवा कसोटी मालिकेत ५८ चेंडूत शतक झळकावून लक्ष वेधले होते. याशिवाय मुंबईकर आयुष म्हात्रे याचाही संघात समावेश करण्यात आला आहे.

भारतीय संघासोबत 'अ' गटात पाकिस्तान, जपान आणि युएई या संघाचा समावेश आहे. दुसरीकडे 'ब' गटात अफगाणिस्तान, बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंका हे संघ आहेत. भारतीय संघ २६ नोव्हेंबरला शारजाहच्या मैदानात बांगलादेशविरुद्धच्या सराव सामन्याने या मोहिमेला सुरुवात करेल. मुख्य फेरीत भारतीय संघ ३० नोव्हेबरला पाकिस्तानविरुद्ध मैदानात उतरणार आहे. हा सामना दुबईच्या मैदानात खेळवण्यात येईल.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com